www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 323 शुक्रवार दि. 07 ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

## आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनी रमाबाई आंबेडकर झोपडपट्टीत अन्न धान्य वाटप

### माजी उपमहापौर सिताताई पाटील यांचा सामाजिक उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त संध्याकाळी सामाजिक उपक्रम म्हणून माजी उपमहापौर सिताताई पाटील यांनी खांदा कॉलनीतल रमाबाई आंबेडकर नगर येथे गोरगरीब जनतेसाठी मोफत अन्न धान्य वाटप केले दरवर्षी माजी उपमहापौर सिताताई पाटील यांच्या मंडळा तर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते अन्न धान्य वाटप रक्तदान शिबीर जेष्ठ नागरिकांना कपडे वाटप असे अनेक सामाजिक उपक्रम साजरे केले जातात यंदा गोरगरीब नागरिकांना अन्न धान्य वाटप करून आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस साजरा केला गेला यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते भिमराव पोवार पत्रकार विशाल सावंत मुकंद कांबळे यांची उपस्थिती होती तसेच भाजपचे विविध कार्यकर्ते उपस्थित होते



## रक्षाबंधनापूर्वीच लाडक्या बहिणींना शासनाचा दणका?

### हफ्ता मिळणार नाहीच, याउलट सरकार...

जालना जिल्ह्यात 70 हजार लाडक्या बहिणींची पडताळणी केली जाणार आहे. अंगणवाडी सेविका करणार घरोघरी जाऊन सर्व्हेक्षण करून ही पडताळणी केली जाईल. एकाच कुटुंबातील तिसऱ्या आणि चौथ्या महिलेनेही युक्त्या करून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे आता सरकार अशा महिलांचा पत्ता कट करणार आहे.
लाडक्या बहिणींना शासनाचा दणका?
आता घरोघरी जावून होणार पडताळणी
अनेक महिलांचा पत्ता कट होणार ?
वर्षभरापूर्वी महायुती सरकारने जाहीर केलेल्या बहुचर्चित मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा बराच गाजावाजा झाला. सरकारलाही त्याचा मोठा फायदा



झाला. मात्र आता याच लाडकी बहीण योजनेत अनेक घोटाळे आणि गैरप्रकार झाल्याचं समोर आलंय. काही ठिकाणी पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतलाय. तर काही ठिकाणी शासकीय कर्मचारी महिलांनी पैशांवर डल्ला मारल्याचं समोर आलंय. आता या योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारकडे पडताळणी करण्याचा निर्णय घेतलाय. जालना जिल्ह्यातील 70 हजार लाडक्या बहिणींची पडताळणी केली जाणार आहे.
'लाडकी' सरकारच्या रडारवर
- जालन्यात एकाच कुटुंबातील अनेक महिलांनी शक्कल लढवून लाभ घेतला
- अंगणवाडी सेविकांकडून अशा महिलांचा शोध घेतला जाणार
- अंगणवाडी सेविकांमार्फत घरोघरी जावून पडताळणी करणार
- जिल्ह्यातील 70 हजार लाभार्थी महिलांची यादी प्रशासनाला प्राप्त
- पडताळणीत दोषी आढळल्यास योजनेतून पत्ता कट होणार

दरम्यान लाडक्या बहिणींची पडताळणी केली जात असल्याने विरोधकांनी सरकारवर टीका केलीये. आता महिलांना अपात्र करतील आणि पुन्हा निवडणुकीवेळी पात्र करतील असा आरोप अनिल देशमुखांनी केलाय. तर मंत्री उदय सामंतांनी त्यांना प्रत्युत्तर दिलंय
लाडकी बहीण योजनेमध्ये सुरु असलेले गैरप्रकार थांबवण्यासाठी आधी सरकारने अनेकदा कारवाईचा इशारा दिला. मात्र त्यानंतरही योजनेतील गैरप्रकार थांबण्याचं नाव घेत नाहीयेत. त्यामुळे आता घरोघरी जाऊन पडताळणी केल्यानंतर तरी गैरप्रकार थांबणार का पाहावं लागणार आहे,

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) – पनवेल महानगरपालिका क्षेत्रच्या फिलिप जी नायर यांची सरचिटणीसपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद शंकर कांबळे सहसंपादक**
पनवेल | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या युवक पनवेल महानगरपालिका क्षेत्र सरचिटणीस या पदावर फिलिप जी नायर यांची नियुक्ती उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक करण्यात आली.
ही निवड खालील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली:
सुमित मोरे साहेब – महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य
सुशांत दादा सकपाळ - कोकण युवक अध्यक्ष
प्रभाकर कांबळे साहेब – पनवेल महानगर जिल्हाध्यक्ष
दिनेश दादा जाधव – खांदा कॉलनी शहर अध्यक्ष
अक्षयदादा अहिरे - पनवेल महानगरपालिका क्षेत्र युवक अध्यक्ष
अमोल इंगोले सामाजिक कार्यकर्ता
अंकुश साळवे नवीन पनवेल शहराध्यक्ष
फिलिप नायर यांना ही जबाबदारी पक्षाचे संघटनात्मक काम अधिक बळकट करण्यासाठी आणि युवकांमध्ये चैतन्य







निर्माण करण्याच्या उद्देशाने देण्यात आली आहे.
त्यांच्या अनुभवातून आणि कार्यशैलीतून पक्षाच्या कार्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिवपदी श्रुती म्हात्रे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
काँग्रेस पक्षाचे नेते दिवंगत शाम म्हात्रे यांची कन्या श्रुती शाम म्हात्रे यांनी आजपर्यंतच्या केलेल्या कामाची दखल घेत तसेच पक्षासाठी दिलेले महत्वाचे योगदान लक्षात घेता त्यांची निवड महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी करण्यात आली आहे.
काँग्रेस पक्षासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणाऱ्या व समाजहित, पक्षहित डोळ्यांसमोर ठेऊन नेहमी कार्यरत असणाऱ्या व काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक संप आंदोलन, मोर्चा बैठकांमध्ये सहभागी होणाऱ्या व अन्यायाविरोधात आवाज उठविणाऱ्या, गोरगरीबांना न्याय मिळवून देणाऱ्या श्रुती म्हात्रे यांची निवड काँग्रेस पक्षाच्या सचिवपदी झाल्याने काँग्रेस पक्षात आनंदाचे वातावरण असून पक्षाच्या सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे वाटून आनंद व्यक्त केला आहे. श्रुती म्हात्रे यांचे सर्वच पक्षाचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते



यांच्याशी चांगले संबंध असल्याने सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी, पदाधिकारी कार्यकत्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे समन्वयक गणेश पाटील यांची नवनिर्वाचित कार्यकारी समिती सदस्य तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आर सी घरत यांच्यामवेत श्रुती शाम म्हात्रे यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट घेतली. म्हात्रे यांची निवड केल्याबद्दल राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, सह प्रभारी बी. एम. संदीप, व्यंकटेशजी, म.प्र.काँ. क. ओबीसी अध्यक्ष भानुदास माळी आणि इतर वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांना भेटून श्रुती म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले आहेत. पक्षाने ज्या पदाची जबाबदारी आज माझ्यावर सोपवली आहे ती जबाबदारी महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे पार पाडण्याचा यथाशक्ती प्रयत्न करेन आणि महाराष्ट्रामध्ये पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाचे विचार आणि काँग्रेस पक्षाने आजवर केलेले काम तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा पूर्णपणे प्रयत्न करेन. असे श्रुती म्हात्रे यांनी सांगितले.

## निलेश सोनवणे यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पनवेल महानगरपालिका शहराध्यक्ष पदी निवड



**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे सहसंपादक**
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या शहराध्यक्षपदी निलेश सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली. ही निवड सन्मानपूर्वक आणि उत्साहात पार पडली असून, विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना पदभार देण्यात आला.
या कार्यक्रमाला खालील प्रमुख मान्यवर उपस्थित होते:
सुमित मोरे – महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य
सुशांत दादा सकपाळ – कोकण युवक अध्यक्ष
प्रभाकर कांबळे – पनवेल महानगर जिल्हाध्यक्ष
दिनेश दादा जाधव – खांदा कॉलनी शहराध्यक्ष
अक्षयदादा अहिरे – पनवेल मनपा युवक अध्यक्ष
अमोल इंगोले – सामाजिक कार्यकर्ता
अंकुश साळवे – नवीन पनवेल शहराध्यक्ष
नवीन शहराध्यक्ष निलेश सोनवणे हे मूळचे पत्रकार असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. प्रत्येक पक्षातील नेते, राजकीय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी व अधिकारी,त्यांच्याबरोबर चांगले घनिष्ठ संबंध आहे.ते गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रीय असून विविध उपक्रमांतून त्यांनी लोकांमध्ये जागृती आणि एकोप्याचे कार्य केले आहे.
पक्षाच्या संघटनात्मक बांधणीस बळकटी देणे आणि युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, हा या निवडीमागचा प्रमुख उद्देश असल्याचे मान्यवरांनी सांगितले. सोनवणे यांच्या अनुभवातून आणि कार्यशैलीतून पक्षाच्या कार्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

## महावितरणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत पुण्याचे ‘डॉक्टर, तुम्ही सुद्धा!’ सर्वोत्कृष्ट

### नागपूरचे ‘रंगबावरी’ नाट्यकृती द्वितीय

**दैनिक युवक आधार**
**विदर्भ प्रतिनिधी सतीश कडू**
*नाशिक, दि. ०६ ऑगस्ट २०२५:*
महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक नाट्यस्पर्धेत पुणे प्रादेशिक विभागाच्या संघाने ‘डॉक्टर, तुम्ही सुद्धा’ या नाटकाचे सर्वोत्कृष्ट सादरीकरण करीत प्रथम क्रमांकाचा करंडक पटकाविला. तर नागपूर प्रादेशिक विभागाचे ‘रंगबावरी’ या नाटकाला द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला. येथील महाकवी कालिदास कलामंदिरात महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अतिशय दर्जेदार व विविध विषयांचा वेध घेत घेणाऱ्या चारही प्रादेशिक विभागाच्या नाट्यकृतींना नाशिककर रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. या नाट्यस्पर्धेतील सांघिक, वैयक्तिक विजेते व उपविजेत्यांचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र व संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले. दोन दिवसीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचा बुधवारी (दि. ६ ) सायंकाळी समारोप झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) अरविंद भादीकर, मुख्य तपास अधिकारी दत्तात्रय बनसोडे, नाट्यस्पर्धेचे निमंत्रक व मुख्य अभियंता सुंदर लटपटे, मुख्य अभियंते हरिष गजबे (चंद्रपूर), चंद्रमणी मिश्रा (कल्याण), संजय पाटील (भांडुप), पवनकुमार कछोट (छत्रपती संभाजीनगर), नाट्यस्पर्धेचे मुख्य समन्वयक व मुख्य औद्योगीक संबंध अधिकारी संजय ढोके यांची उपस्थिती होती. या पाहुण्यांच्या हस्ते नाट्यस्पर्धेतील विजेत्या संघांना करंडक तसेच वैयक्तिक गटातील विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. नाट्यस्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रभाकर दुपारे,




चंद्रकांत जाडकर, मीनाक्षी केंढे यांनी काम पाहिले. सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे म्हणाले, महावितरणच्या कामाचे स्वरूप पाहता नाट्यकर्मी कर्मचाऱ्यांना खूप कमी वेळ मिळतो. तरी देखील अथक परिश्रम घेत नाट्य कलावंतानी अतिशय दर्जेदार कलाकृती सादर केल्या आहेत. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना नवऊर्जा देणारी ही नाट्यस्पर्धा आहे असे त्यांनी सांगितले. बक्षिस वितरण कार्यक्रमाला महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते, अधिकारी, कर्मचारी व नाट्यरसिक बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी विकास आढे व रंगकर्मी संदीप पाचंगे यांनी केले. या नाट्यस्पर्धेत कोकण प्रादेशिक विभागाने ‘आवर्त‘, पुणे प्रादेशिक विभागाने ‘डॉक्टर तुम्ही सुद्धा‘, नागपूर प्रादेशिक विभागाने ‘रंगबावरी‘ आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाने ‘केस नं. ९९‘ नाट्यप्रयोग सादर केले. पारितोषिक वितरण सोहळ्याचे
*राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे –*
सर्वोत्कृष्ट नाटक : प्रथम– डॉक्टर, तुम्ही सुद्धा ! (पुणे), द्वितीय– रंगबावरी (नागपूर)
दिग्दर्शन : प्रथम – ज्ञानदेव पडळकर (पुणे), द्वितीय – संध्या चिवंडे (नागपूर)
अभिनय (पुरुष) : प्रथम – विजय जोशी (पुणे), द्वितीय – श्रावण कोळनुरकर (छत्रपती संभाजीनगर)
अभिनय (स्त्री) : प्रथम – रोहिणी ठाकरे(नागपूर), द्वितीय – भक्ति जोशी(पुणे)
नेपथ्य : प्रथम – सतीश सरोदे (पुणे), द्वितीय – राम मेस्त्री (कोकण) प्रकाशयोजना : प्रथम – अभय येरडे(छत्रपती संभाजीनगर), द्वितीय – अभिजीत सिकनिस (कोकण) संगीत : प्रथम – रुपेश देशमुख(नागपूर), द्वितीय – अनिल राजपूत(छत्रपती संभाजीनगर) रंगभूषा व वेशभूषा : प्रथम – विकास पुरी (पुणे), द्वितीय – प्रशांत ठाकरे(नागपूर)
उत्तेजनार्थ (अभिनय) : श्रद्धा मुळे (कोकण), सचिन निकम (पुणे), सायली सायनकर (नागपूर) आणि रमेश शिंदे (छत्रपती संभाजीनगर) यांना सन्मानित करण्यात आले
पारितोषिक वितरण सोहळ्याला राज्यभरातील महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते, अधिकारी, कर्मचारी व नाट्यरसिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक कै . गजानन खारपाटील गुरुजी यांची पाचवी पुण्यतिथी साजरी.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी/एम.डी.भोईर**

माऊली महिला हरिपाठ मंडळ चिंचवली यांच्या हरिनामाचा गजर चिरनेर मध्ये घुमला!!

चिरनेर येथील आदर्श शिक्षक गजानन खारपाटील गुरुजींची पाचवी पुण्यतिथी चिरनेर येथील मातृपितृ छाया या त्यांच्या निवासस्थानी साजरी करण्यात आली.

गजानन खारपाटील गुरुजी यांना रायगड जिल्हा परिषदेने १९८२ साली आदर्श शिक्षक आणि शिवभूमी शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. १९८३ साली उमरठ येथे सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांच्या स्मृतिदिनी झालेल्या वकृत्व स्पर्धेत त्यांचा रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला होता.अल्पबचत साठी त्यांना रायगड जिल्हा कलेक्टर यांनी सन्मानित केले होते.

शालेय जीवनात सातवी मध्ये केंद्रात प्रथम, एस. एस. सी मध्ये उरण तालुक्यात प्रथम, डी एड ला रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला होता. त्यांच्या पत्नी सौ शारदा खारपाटील यांना रायगड जिल्हा परिषदेने १९९० साली आदर्श शिक्षिका म्हणून सन्मानित केले होते. गुरुजींची तिन्ही मुले बी एस सी.. केमिस्ट्री आहेत.

त्यांना अभिवादन करण्यासाठी उद्योगपती पी पी खारपाटील, उद्योगपती राजाशेठ खारपाटील, कर्जत पंचायत समिती चे माजी सभापती तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य , काँग्रेस नेते अरविंद पाटील,सौ.मनिषा



नितिन ठाकूर ( जिल्हानिहाय वक्ता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि श्री. नितिन लक्ष्मण ठाकूर (सोशल मिडिया समन्वयक उरण विधानसभा ) चिरनेर ग्रामपंचायत चे माजी सरपंच पद्माकर फोफेरकर ,चिरनेर शिवसेनेचे माजी शाखाप्रमुख पद्माकर मोकल,चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सचिन घबाडी, आदर्श शिक्षक संजय होळकर, , अर्थ व सांख्यकीय संचनालय मुंबई चे सेवानिवृत्त संशोधन अधिकारी काशिनाथ मोकल, उरण इंटक चे अध्यक्ष राजेंद्र भगत , नाट्य कलाकार संतोष ठाकूर, गायनाचर्य वासुदेव पाटील, , चिरनेर हरिपाठ चे दत्ता मोकल, गोपाल दुंगीकर, रमेश गोंधळी,भजनसम्राट हरिश्चंद्र बुवा गोंधळी, पत्रकार तृप्ती भोईर, रणीता ठाकूर , अनंत नारंगीकर, आगरी भूषण प्राध्यापक संदेश पाटील,सेवानिवृत मुख्याध्यापक ए डी पाटील सर,सेवानिवृत शिक्षिका माधवी म्हात्रे, कर्जत पंचायत समिती मधील जनार्दन पानमंद, पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते दिपक कदम,शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे शशांक ठाकूर,सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस इन्स्पेक्टर अशोक पाटील, रांजणपाडा.. चिंचपाडा ग्रामस्थ कमिटी चे उपाध्यक्ष प्रितेश फुंडेकर,उद्योजक गजेंद्र सिंह राजपुरोहित, सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचे सुरेश केणी, सुभाष पाटील,निर्मला केणी, जेएनपीटी चे सेवानिवृत्त कामगार नरेंद्र ठाकूर, घनश्याम भोईर,गुरुजींचे नातेवाईक, विद्यार्थी, खारपाटील परिवार, चिरनेर ग्रामस्थ आदी शेकडो जणांनी उपस्थित राहून गुरुजींना आदरांजली वाहिली.

यावेळी माऊली महिला हरिपाठ मंडळ चिंचवली यांचा सुश्राव्य हरिपाठ झाला. सर्वजण भक्तिरसात तल्लीन झाले होते. भक्तिरसात तल्लीन झालेल्या हरीभक्तांना अक्षरशः खुर्चीस खिळवून ठेवले होते .प्रास्ताविकात मिलिंद खारपाटील यांनी सांगितले की वाचाल तर वाचाल हा गुरुजींचा संदेश होता.गुरुजींच्या स्मृतीप्रित्यर्थ आतापर्यंत पाच लाख रुपयांची पुस्तके अनेक शाळा आणि वाचनालयांना दिली असून भविष्यात आणखी काही पुस्तके देण्याची घोषणा त्यांनी केली.

गुरुजींनी अनेक विद्यार्थी घडवले. नाट्य दिग्दर्शन करून रायगड जिल्ह्यात अनेक नाट्य कलाकार निर्माण केले. त्यांचे अनेक विद्यार्थी स्कॉलर असून उच्चपदस्थ आहेत असे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री अरविंद पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. पुण्यतिथी चे औचित्य साधून

कातळपाडा आणि चिंचपाडा रांजणपाडा येथे चित्रकलेच्या वह्या आणि रंगीत खडू ,खाऊ यांचे वाटप करण्यात आले.

## कै.द्वरकाबाई थेपडे इंग्लिश मिडीयम स्कूल येथे रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**



जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे 7/8/25 रोजी शासनाच्या उपक्रमांतर्गत राखी बनविणे कार्यशाळा. कै.द्वरकाबाई थेपडे इंग्लिश मिडीयम स्कूल म्हसावद या शाळेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यशाळेत एकुण 70 विद्यार्थी सहभाग घेतला होता यात तिरंगा त्या वापर करून तसेच टाकाऊ वस्तूंपासून सुन्दर आकर्शीत मनमोहक राख्या तयार करण्यात आल्या तसेच भावा-बहीनीच्या नात्याविषयी आदर व प्रेम कर्तव्य विषयावर शाळेचे मुख्याध्यापक संगीता मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षेक बंधू नी मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला

## दि. दीपक काशिनाथ गायकवाड यांच्या स्मृतिदिनानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी

## १३ वे वर्ष अगणित सेवाभाव ;निःशुल्क वैद्यकीय सेवा...

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

*दिवंगत दीपक काशिनाथ गायकवाड यांच्या तेराव्या स्मृतिदिनानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले .यात ४00 हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला या शिबिराचा लाभ सर्वांना मिळावे यासाठी अनेक नागरिकांच्या अडीअडचणी वर्षभर सोडवता येतील अश्या पध्दतीने नियोजन करण्यात आले .यात एमजीएम हॉस्पिटल पनवेल व्यवस्थापनाच्या वैद्यकीय टीम ने विशेष कार्य केले. या शिबिरामध्ये शारीरिक वैद्यकीय चाचण्या ,तपासण्या करून उपचार देण्यात आले दीपक ब्रदर्स मालवण ग्रामस्थ तसेच मनोहर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यामानाने यंदा सदर शिबिराचे १३ वे वर्ष पूर्ण झाले. यावेळी खोपोली शहरातील सामाजिक राजकीय क्षेत्रातील अनेक मंडळींनी उपस्थिती दाखवली तसेच सर्वांतर्फे सामूहिक अभिवादन व आदरांजली वाहिण्यात आली.



## जनजागृती सेवा संस्थेच्या आरती संग्रहाचे प्रकाशन, गणेश भक्तांना मोफत आरती संग्रहाचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**कणकवली प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर**

||तु सुखकर्ता,तु दुःखहर्ता||काही दीवसातच गणरायाचे आगमन मोठ्या दिमाखात होणार आहे.कोकणात हा सण मोठ्या हर्षोल्लासात साजरा केला जातो.प्रत्येकाच्या घरात गणराया विराजमान होणार आहे.टाळ मृदुंगाच्या गजरात भजन, आरत्या होणार आहेत.आरती संग्रह प्रत्येक घरात असावा,हा आरती संग्रह जनजागृती सेवा संस्थेकडून मोफत दिला जाणार आहे.त्याच अनुषंगाने संस्थेच्या वतीने नुकताच गुरुप्रसाद बिल्डिंग, तेली आळी,ता.कणकवली येथे आरती संग्रह प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात सन्मानिय प्रमुख पाहुणे चंद्रशेखर उपरकर (अध्यक्ष-लावण्यसिंधु लोककला चित्रपट सहकारी संस्था)सौ.अक्षता कांबळी(वेतोबा फेम सिरीयल मधील गावमामी, अभिनेत्री, अध्यक्षा-सिंधुरत्न फाऊंडेशन), अशोक वि.चिंदरकर(सेवा निवृत्त एल.आय्. सी. शाखा व्यवस्थापक, मुंबई), सेवा निवृत्त उप शाखा व्यवस्थापक-स्टेट बॅंक ऑफ इंडिया, कणकवली),भरत तोरसकर(जेष्ठ सेवा निवृत्त कर्मचारी,एस. टी. महामंडळ, कणकवली वर्क शॉप), मंगेश चिंदरकर(उद्योजक-कणकवली) यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली.त्यानंतर संस्थचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे संस्थेचा अहवाल,शाल, गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.तसेच उपस्थित सन्मानिय प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.सर्वच मान्यवरांनी संस्थेच्या



कार्याचे कौतुक केले.आरती संग्रह कमी वेळात प्रसिद्ध करुन देणारे अष्टविनायक प्रिंटर्सचे संचालक नितेश विशे तसेच समारंभत सहकार्य करणाऱ्या सौ.गंधाली तिरपणकर यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.प्रकाशनानंतर गणेश भक्तांना आरती संग्रह मोफत देण्यात आले. शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विंचूरचे सुनील क्षिरसागर यांना 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' जाहीर

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



विंचूर (ता. निफाड) : येथील पत्रकार सुनील शिरसागर यांना त्यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल अक्षराज मीडिया परिवाराचे मुख्य संपादक विनोदजी गोरे व सह संपादिका प्राजक्ता गोरे यांच्याकडून दै.अक्षराजच्या वर्धापन दिनानिमित्त यंदाचा "उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण, समाजाभिमुख आणि तथ्यपूर्ण पत्रकारितेची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे.

पत्रकार क्षिरसागर हे गेल्या अकरा वर्षांपासून स्थानिक स्तरावर पत्रकारिता करत असून, सामाजिक प्रश्न, प्रशासनाच्या कार्यपद्धती तसेच ग्रामीण जीवनातील विविध पैलूंना वाचा फोडण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या लिखाणातून ग्रामीण जनतेचे प्रश्न नेहमीच प्रभावीपणे मांडले गेले असून, प्रशासनालाही जागे करण्याचे कार्य त्यांनी वेळोवेळी केले आहे.

उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान समारंभ लवकरच श्री क्षेत्र आळंदी येथे पार पडणार असून, अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान केला जाणार आहे. त्यांच्या या यशामुळे विंचूर परिसरात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सोयाबीन पिकावर खोडमाशी, चक्रीभुंगा अळीचा प्रार्दुभाव,कृषी विभागाकडुन शेतीच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर शिरूरआनंतपाळ**

: ढगाळ वातावरणामुळे फुलोर्‍यात असलेल्या सोयाबीन पिकावर खोडमाशी, चक्रीभुंगा, हुमणी व अळ्याचा अळ्याचा प्रार्दुभाव झाल्याने शेतकरी महागामोलाची किटक नाशक औषधाची फवारणी करत असुन शेतकर्‍यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिरूरआनंतपाळ तालुका कृषी अधीकारी ढाकणे व कृषी पर्यवेक्षक बालाजी राजमाने, कृषी साहाय्यक श्रीमती एम.ओ.मोदी व कृषी विभागाची टीम शेतकर्‍यांच्या बांधावर जाऊन शेतकर्‍यांना मार्गदर्शन करत आहेत.

येरोळ व परिसरात मृग नक्षत्रात पडलेल्या पावसाच्या ओलीवर शेतकर्‍यांनी सोयाबीनची पेरणी केली.



सध्या सोयाबीन कुठे फुलोरा अवस्थेत तर कुठे शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. गेल्या आठ दिवसापासुन ढगाळ वातावरण असल्यामुळे सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, हुमणी व अळ्याचा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात दिसुन येत आहे. त्यामुळे शिरुरआनंतपाळ तालुका कृषी अधिकारी ढाकणे, कृषी पर्यवेक्षक राजवाडे, येरोळ येथील कृषी पर्यवेक्षक श्रीमती एम.ओ.मोदी व कृषी विभागाची टिम शेतकर्‍याच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन सोयाबीन पिक उत्पादक शेतकर्‍यांना मार्गदर्शन करत आहेत.

**कामगंध सापळे वापरावे...**

सोयाबीन पिकावर पाणे खाणार्‍या अळीचा प्रार्दुभाव वाढला आहे. पाने खाल्यामुळे उत्पादनात घट होते.हे टाळण्यासाठी हेक्टरी पाच स्पोडोलुरचा वापर करण्यात आलेले फोरोमन कामगंध सापळे नियंत्रणासाठी वापरावे. प्रोफोनोफाक्स ५० इसि २० मिलि प्रति दहा लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. तसेच रासायनीक नियंत्रनासाठी फीप्रोलीन ४० टक्के अधिक इमीडाक्लोप्रिड ४० टकके दानेदार पाच ग्राम दहा लिटर पाण्यात मिसळुन फवारनी करावी.

सोयाबीन पिकावर खोडमाशीचा प्रार्दुभाव दिसुन आल्यास क्लोरोनट्रोनिलीटोप्रोल १८.५ इसी २० मीली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळुन हाताला मौज्या व तोंडाला मास्क बांधुन सुरक्षीत फवारनी करावी असे आवाहान तालुका कृषी अधिकारी ढाकणे यांनी केले आहे. आधीच शेतकरी सोयाबीनची दुबार तिब्बार पेरणी करुन आर्थिक संकटात सापडला असुन आता नैर्सगीक संकटात उदभवत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

# संविधान सप्ताह जनजागृती अभियान संपन्न राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब सिंदखेड राजा...

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे दिनांक पाच ऑगस्ट 2025 रोजी संजीवनी बहुउद्देशीय शिक्षण व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र व राजश्री शाहू शैक्षणिक क्रीडा संस्था शहा अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिखली संस्थापक अध्यक्ष राजेंद्रजी लहाने यांच्या संयुक्त विद्यमाने "आम्ही भारताचे लोक संविधानावर निष्ठा हीच प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा", संविधान सत्ता जनजागृती अभियान तिसरा वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तेजरावजी मस्के हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अॅड जेबा शेख बीड सुखदेवराव बोर्डे,



दिलीप शिरसाट दगडूजी गवई, सौ संगीताताई साळवे सौ मायाताई ठोंबरे दिगंबर पाटोळे एडवोकेट नेन मॅडम हे होते. भारताचे संविधान घेऊन रॅली ही मातृतीर्थ मासाहेब जिजाऊ राजवाड्यापर्यंत निघाली. या रॅलीचे नेतृत्व संस्थापक अध्यक्ष राजेंद्रजी लहाने यांच्यासह भाई दिलीप खरात यांनी केले. संविधान अमर रहे, संविधान जिंदाबाद,संविधान बचेगा तो देश बचेगा,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज,राजमाता मासाहेब जिजाऊ,व थोर महापुरुषांच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता.रॅली मधील सर्व लोकांना आकर्षक रंगीत असे फेटे असल्यामुळे रॅलीआकर्षक वाटत होती.त्यानंतर पंचायत समितीच्या भव्य हॉलमध्ये संविधान व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत समारमानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्रजी लहाने यांनी प्रास्ताविक भाषण केले त्यामध्ये त्यांनी संविधानावर प्रकाश टाकला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांची भाषणे झाली. अध्यक्ष भाषनामध्ये तेजराव मस्के यांनी सांगितले की संविधान जनजागृती करणे सध्याच्या काळात खूप गरजेचे आहे नाहीतर परत सामान्य लोकांना गुलाम व्हावे लागेल. पुढच्या वर्षीच्या येणाऱ्या चौथ्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च आम्ही सिनखेडराजा वाशी करु आपण फक्त हजारोच्या संख्येने पाहुणे म्हणून उपस्थित रहा.संविधान जनजागृती कार्यक्रमाला राज्यभरातून संविधान प्रेमी यांनी हजेरी लावली होती.शेवटी राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यक्रमाला बबनराव खरात,राजेंद्रजी लहाने, सुखदेवराव बोर्डे दिलीप शिरसाट,दगडूजी गवई,श्रीकृष्ण गवई,संगीता ताई साळवे, प्रजापती तिडके,मदन जी मस्के,बबनराव खंदारे,सुनील अंभोरे,राजीव जाधव,गजानन जाधव,शिवाजी मोरे,गोकुळजी शिंदे,राजीव इंगळे,गजानन जाधव,सौ.मायावती कांबळे, दिगंबर पाटोळे,प्रदीप साळवे,रामेश्वर भुतेकर,प्रदीप सपकाळ,राजेश्री उफाडे,गणेश परिहार,गोकुल शिंगणे खांडे पाटील भगवान खंदारे आसाराम चव्हाण इत्यादी संविधान प्रेमी संविधान रक्षक यांनी हजेरी लावली होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्रजी लहाने यांनी केले.तर आभार प्रदर्शन डॉ. बबनराव खरात यांनी केले.

## लायन क्लब उरण गोल्ड द्वारे "स्त्री स्वच्छता"या विषयावर जागरूक्ता कार्यक्रमाचे जासई येथे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

जासई येथील ५ ऑगस्ट २०२२५ रोजी आर.के.जी पब्लिक स्कूल, जसाई येथे लायन क्लब उरण गोल्ड द्वारे “स्त्री स्वच्छता” या विषयावर जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल ज्ञान वाढवणे आणि विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढवणे हा होता. कार्यक्रमाच्या मुख्य संरक्षक लायन क्लबच्या सदस्या श्रीमती रंजना म्हात्रे आणि लायन क्लबच्या अध्यक्षा श्रीमती निरज कादियन होत्या. या कार्यक्रमादरम्यान संस्थापक अध्यक्ष श्री. संतोष घरत आणि मुख्याध्यापिका सौ वैशाली नगराळे,कर्मचारी सदस्या सुरेखा पाटील मॅडम आणि शिक्षक उपस्थित होते.

दोन्ही पाहुण्यांनी मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल त्यांचे अफाट अनुभव, ज्ञान आणि विचार मांडले. सर्व शालेय मुलींना सॅनिटरी पॅड वाटून कार्यक्रमाचा शेवट झाला.शेवटी शाळेने




त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि शाळेने उपस्थीत मान्यवरांचे आभार मानले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## वडदहसोळच्या श्री जाकादेवी मंदिर जिर्णोद्धार निधी संकलनासाठी दादर येथे दि.10 ऑगस्ट रोजी कलगीतुऱ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:- (प्रमोद तरळ)**

तालुक्यातील मौजे वडदहसोळ गावातील श्री जाकादेवी मंदिर जिर्णोद्धार निधी संकलनासाठी श्री योगेश लक्ष्मण पळसमकर आणि वडदहसोळ मुंबईकर मंडळी यांच्या संकल्पनेतून कोकणची लोकप्रिय लोककला कलगीतुऱ्याचा जंगी सामना रविवार दि १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वा. श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर दादर येथे आयोजित करण्यात आला आहे

सदर जुगलबंदी प्रसिद्ध शक्तीवाले शाहीर श्री राजेश निकम विरुद्ध सुमधुर आवाजाचे बादशहा आणि कॅसेट किंग श्री विकास लांबोरे या तुल्यबळ शाहिरां मध्ये रंगणार आहे.

या सामन्यातून येणारा निधी हा श्री जाकादेवी मंदिर जिर्णोध्दारासाठी वापरण्यात येणार आहे अधिक माहितीसाठी विजय पळसमकर - 9653647131, तुषार म्हादये - 8097174126, रवींद्र गितये - 9664161807, गंगाधर म्हादये - 9892104080, चेतन राऊत - 7045146128, झीलू धुमाळ - 8097347706, विजंत जाधव - 7387965410 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा सदर सामन्याचे तिकीट घेऊन मंदिराच्या जिर्णोद्धार निधी संकलनासाठी हातभार लावावा अशी नम्र विनंती आम्ही मुंबईकर वडदहसोळकर यांनी केले आहे






**दैनिक युवक आधार** - आळंदी येथे भक्ती शक्ती वारकरी गुरुकुल या ठिकाणच्या सर्व मुलांना श्रावण महिन्यात फळे वाटप करून त्यांच्याबरोबर आनंद घेतला यावेळी कुमारी जयश्री कासार बाल कीर्तनकार यांचे सोश्राव्य कीर्तन व हरिपाठ असे अनेक कार्यक्रम झाले यावेळी आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले प्रमुख मार्गदर्शक व्यसनमुक्त जिवन काळाची गरज सौ संगितताताई दिलीप आमले उपजिल्हाप्रमुख शिवसेना नवी मुंबई अंकिता दिलीप आमले संचालिका अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल तसेच भागवताचार्ये हभप सौ चव्हाण,हभप साधु महाराज व भक्ती शक्ती वारकरी गुरुकुल वारकरी विद्यार्थी यांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले

# वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी ग्लोबल कंझ्युमर प्रॉडक्ट्स - कॅरेटलेन ची भागीदारी

## कॅरेटलेनच्या अनोख्या दागिन्यांचे कलेक्शन पहिल्यांदाच भारतात लाँच

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**

७ ऑगस्ट २०२५ : भारतातील आघाडीचे ओम्नी-चॅनल ज्वेलर्स, टाटा परिवारातील एक कंपनी कॅरेटलेन यांनी वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी ग्लोबल कंझ्युमर प्रॉडक्ट्सच्या सहयोगाने 'F.R.I.E.N.D.S.' प्रेरित सोने आणि हिऱ्यांच्या अनोख्या, आकर्षक दागिन्यांच्या कलेक्शनचे अधिकृत लाँचची घोषणा केली आहे. 'फ्रेंड्स' आणि कॅरेटलेनने मिळून तयार केलेले हे कलेक्शन सोने आणि हिऱ्यांच्या जगात सिटकॉमच्या लोकप्रियतेचा अनुभव घेऊन येते. मैत्री दिनाच्या निमित्ताने भारतात लाँच करण्यात आलेले हे कलेक्शन ग्राहकांसाठी एक खास पर्वणी ठरत आहे.

जगभरात 'फ्रेंड्स' ह्या शोचे कोट्यवधी चाहते आहेत. आज अनेक पिढ्या ह्या शोला त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग मानतात. पॉप संस्कृती आणि मैत्रीवर या शोने स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. हे कलेक्शन ९० आणि २००० च्या दशकातील तरुणांमध्ये शोच्या आठवणी व त्यावरील प्रेम पुन्हा जागृत करते हीच ती पिढी आहे जी चँडलरच्या व्यंगाचे अनुकरण करत आणि फीबीच्या गाण्यांवर थिरकत मोठी झाली आहे. ९ कॅरेट आणि १४ कॅरेट सोने, इनॅमल आणि हिऱ्यांनी बनवलेल्या या कलेक्शनमध्ये ३० हून अधिक डिझाईन्स आहेत, जी जुन्या आठवणींना उजाळा देतात. सिटकॉममधील सुप्रसिद्ध घटकांपासून प्रेरित डिझाइन्स यामध्ये आहेत जसे की, लॉबस्टर, सोफा, स्मेली कॅट, पिवळी दरवाजाची चौकट आणि




जोईचा पिझ्झा.

श्री.शोमेन भौमिक, व्यवस्थापकीय संचालक, कॅरेटलेन म्हणाले,"कॅरेटलेनमध्ये, आम्ही नेहमीच असे मानत आलो आहोत की दागिने असे असावेत की त्यांनी तुमची कहाणी सांगावी. एका संपूर्ण पिढीसाठी, F.R.I.E.N.D.S शो हा त्यांच्या कथेचा एक भाग आहे. वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी ग्लोबल कंझ्युमर प्रॉडक्ट्ससोबत पुन्हा एकदा सहयोग करून आणि हा आयकॉनिक आयपी तयार करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आम्हाला आमच्या विद्यमान हॅरी पॉटर आणि द पॉवरपफ गर्ल्स कलेक्शनमध्ये हे जोडताना खूप अभिमान वाटत आहे. आमचे ब्रँड वाक्य "खुल के करो एक्सप्रेस" च्या अनुषंगाने, हे कलेक्शन ग्राहकांना आठवणींच्या दुनियेत घेऊन जाईल, आणि आयुष्याला अधिक मौल्यवान आणि अविस्मरणीय बनवणाऱ्या मैत्रीचे महत्त्व साजरे करते."

या लाँचच्या निमित्ताने कॅरेटलेनने आपल्या ग्राहकांना ह्या लोकप्रिय सिटकॉमच्या जगाचा अद्भुत अनुभव देण्यासाठी मॉल अक्टिव्हेशनचे आयोजन केले होते. या रोमांचक कार्यक्रमात F.R.I.E.N.D.S. बद्दल अनेक मनोरंजक तथ्ये सादर केली गेली, ज्यामुळे एक हलकेफुलके, जुन्या आठवणींना उजाळा देणारे आणि विनोदी वातावरण निर्माण झाले होते. तिथे भेट देणाऱ्यांना मोफत स्टिकर्स कार्ड्स दिली गेली. F.R.I.E.N.D.S. प्रेरित क्षण टिपण्यासाठी एक मजेदार फोटो बूथ, तसेच सोशल मीडियावर रीपोस्ट करण्यासाठी मोफत पोलरॉइड्स देखील उपलब्ध होते. ग्राहकांना उत्साहित करण्यासाठी आणि ब्रँडप्रती त्यांचे प्रेम अधिक दृढ करण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली होती.

## वर्दीतील दर्दी माणूस मदतीसाठी धावला!

### आगीत सर्वस्व गमावलेल्या आदिवासी कुटुंबांना दिलासा देणारा पोलीस हात

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :- निफाड तालुक्यातील धारणगाव खडक येथील अकरावड वस्तीवरील तीन आदिवासी कुटुंबांचे संसार काही दिवसांपूर्वीच्या मध्यरात्री भीषण आगीत भस्मसात झाले. रात्री सुमारास लागलेल्या या आगीत गोविंद चंद्रभान माळी, भाऊसाहेब विश्वनाथ वाघ आणि दगुबाई श्रीहरी माळी या कुटुंबांचे लाखो रुपयांचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. यात त्यांचे घरटे, वस्तू, ओळखी, आणि भविष्य क्षणार्धात उध्वस्त झाले.



या धक्कादायक घटनेनंतर मदतीचा कुणीतरी हात पुढे येईल का, या आशेने व्याकुळ असलेल्या कुटुंबांना लासलगाव पोलीस ठाण्यातील वर्दीतले संवेदनशील अधिकारी उपनिरीक्षक किरण साळुंखे, पोलीस कॉन्स्टेबल सागर आरोटे आणि चंदू मांजरे यांनी मायेचा हात दिला. सपोनि भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, या अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत, आगीत होरपळलेल्या कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. त्यांना मानसिक धीर देत, या संकटसमयी आपण एकटे नाही, हा दिलासा दिला. या कार्यात पोलिस पाटील राहुल सोनवणे, एकलव्य संघटनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख रामेश्वर माळी, तसेच इतर समाजहितैषी मंडळींनीही साथ दिली. ही मदत माणुसकीची साक्ष देणारी आहे. त्यांच्यासाठी ही केवळ दिलासा देणारी मदत नव्हे, तर एक आशेचा किरण आहे. दुःखाच्या काळोखात माणुसकीचा एक दिवा उजळवणाऱ्या या पोलीस अधिकाऱ्यांचे कार्य समाजासाठी खरोखरच प्रेरणादायी ठरत आहे.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांचा वाढदिवसा निमित्त गुरु लिंगेश्वर शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व महिलांना साडी वाटप.




दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी :

- स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांचा वाढदिवस आठ ऑगस्ट रोजी साजरी होत असून याचे अवचित साधून आज गुरुवार दि ०७ ऑगस्ट रोजी गुरु लिंगेश्वर शाळा पनवेल येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार खाऊ वाटप व महिलांना भगिनींना साडी वाटप समारंभ ठेवण्यात आला होता

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ संदिप आमले ज्येष्ठ नेते नरेंद्र गायकवाड सामाजिक कार्यकर्ते बाबा नाईक यांची उपस्थित लाभली यावेळी मान्यवरांनी महापुरुषाला पुषहार घालून वंदन केले यावेळी उपस्थित मान्यवारांचे महिला भगिनींचे स्वागत करण्यात आले

गुरु लिंगेश्वर शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शाल ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला

स्वाभिमान रिपब्लिकन पक्ष च्या कार्यकर्त्या महिलांना महेश साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला भगिनींना साडी वाटप करण्यात आले

महेश साळुंखे यांच्याकडून शाळेला महापुरुषांचे फोटो देण्यात आले

यावेळी उपस्थित मान्यवर चंद्रकांत वेळासकर निलेश कांबळे असिफ शेख, जवेद मास्टर समाधान कांबळे भारत दातार, पांडुरंग कांबळे रवी गायकवाड, मनोज कांबळे मयूर गायकवाड, दया नाईक विलास नांगरे, अरुण जाधव महिला आघाडी अध्यक्ष ममताज पठाण,निशा कोळी मुख्यध्यपक प्रवीण शिलवंत सर आदी सह अनेक मान्यवर उपस्थित होते

## तहसीलमध्ये महसूल अदालत; वनसगावच्या दीर्घकालीन वादाचा समझोत्याने निपटारा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड (ता.७) – राज्य शासनाच्या आदेशानुसार १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यान 'महसूल सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर निफाड तहसील कार्यालयात ७ ऑगस्ट रोजी महसूल अदालतीचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील रस्त्यांशी संबंधित सुरु असलेल्या वहिवाट प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्याच्या उद्देशाने ही अदालत आयोजित करण्यात आली होती. या महसूल अदालतीमध्ये एकूण ३१ प्रकरणांचा समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये वनसगाव येथील वहिवाट प्रकरण (केस क्र. २५/२०२३) विशेष ठरले. अर्जदार श्री. चिंधुराम साहेबराव शिंदे आणि प्रतिवादी संतोष दत्तू शिंदे (दोघेही रा. वनसगाव) यांच्यात मागील तीन वर्षांपासून सुरू असलेला रस्त्यावरील वाद आपसी समझोत्याने मिटवण्यात यश आले. ही महसूल अदालत अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या संघर्षावर तोडगा काढणारी ठरली. या प्रसंगी वादी चिंधुराम शिंदे म्हणाले, "गेल्या तीन वर्षांपासून आम्ही या प्रकरणामुळे मानसिक तणावात होतो. महसूल विभागाने समजुतीने संवाद साधण्यास मदत केली आणि आम्ही योग्य निर्णय घेतला. विभागाचे आम्ही आभार मानतो." तर प्रतिवादी संतोष शिंदे म्हणाले, "वाद न्यायालयात चालवण्यापेक्षा आपसात चर्चा करून तो मिटवणे योग्य. तहसीलदार साहेबांच्या पुढाकारामुळे आम्ही शांततेने निर्णय घेऊ शकलो. यापुढे आम्ही एकोप्याने राहणार आहोत." महसूल अदालतीच्या अध्यक्षस्थानी मा. तहसीलदार विशाल नाईकवाडे होते. यावेळी निफाड वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष अड. प्रविण ठाकरे, अड. देशमुख, अड. चिखले, अड. लोंढे यांनी कायदेशीर सहाय्य दिले. तसेच नायब तहसीलदार बाबासाहेब खेडकर, मंडळ अधिकारी संतोष डुंबरे (विंचूर), ज्ञानेश्वर पगार (देवगाव), गोविंद काळे (रानवड), सतीश बोडके (पिंपळगाव बसवंत) यांची उपस्थिती होती. यासोबतच अव्वल कारकून मारुती ठाकरे, महसूल सहाय्यक गणेश कुमावत, ललीत खैरे, सागर रोकडे आणि शरद घाटगे यांनी अदालतीच्या आयोजनात मोलाचे योगदान दिले.



## स्व.पार्वतीबाई सावळेकर, रोटरी सभागृह, नवीन पनवेल येथे "प्रॉपर्टी मंत्रा" कंपनीतर्फे 'प्रॉपर्टी मंत्रा जल्लोष २०२५"हा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

स्व. पार्वतीबाई सावळेकर, रोटरी सभागृह, नवीन पनवेल येथे रविवारी "प्रॉपर्टी मंत्रा" कंपनीचे सर्वेसर्वा मॅनेजिंग डायरेक्टर श्री.किशोर जालिंदर माने व सह आयोजक सौ.अश्विनी किशोर माने यांच्या तर्फे "प्रॉपर्टी मंत्रा जल्लोष २०२५" हा कार्यक्रम पार पडला.श्री.संतोष तोत्रे व वंदना पुत्री, पूजा जाधव यांनी सभागृहाचे व्यासपीठ उत्तम प्रकारे संभाळले.तसेच प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी श्री.महेंद्र वाघमारे व श्री.शरद घोडके व सौ.विशाखा लाड यांनी आपल्या सुमधुर आवाजात सुंदर गाणी सादर केली. तसेच नृत्य बाल कलाकार कु.यशवी पोसम व कु.दिव्या बोबडे यांनी पार पाडली.श्री. सुरेश बोबडे यांनी आपल्या




उत्कृष्ट कविता सादर केल्या. व्यासपीठावरची सर्व जबाबदारी सौ.स्वरा पोसम व सौ.प्रीती दास यांनी उत्तमरित्या पार पाडली.श्री.किशोर माने यांच्या शुभहस्ते ट्विन्स एसएलआर फिल्म प्रॉडक्शन निर्मित "बेवफा सनम" (ब्रोकन हार्ट) या म्युझिक ऍल्बमचे तसेच "खौफ" या वेब सिरीजच्या बॅनरचे अनावरण करण्यात आले.व्यासपीठावर ऍल्बमशी निगडित कलाकार श्री.राहुल साखरे,नवा चेहरा संघवी सुमन व प्रसिद्ध मॉडेल अभिनेता श्री.ग्यान आर जे तसेच श्री.सचिन तांडेल यांनी आपली उपस्थिती लावली. त्याचबरोबर ट्विन्स एसएलआर फिल्म प्रॉडक्शनचे प्रोड्युसर श्री.राजेंद्र देशमुख विश्वासराव तसेच को- ऑर्डीनेटर श्रीमती. राजश्री पाटील उपस्थित होते. त्याचसोबत प्रसिद्ध लेखिका श्रीमती.कुसुम कोडेकर यांनीही उपस्थिती दाखवली होती."प्रॉपर्टी मंत्रा जल्लोष २०२५" या कार्यक्रमाच्या अंतर्गत आलेल्या सर्व कलाकारांचा तसेच सभासदांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.त्याच सोबत पहिला लकी ड्रॉ सुद्धा काढण्यात आला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.अशोक यादव व श्री.विशाल घुणकीकर तसेच सौ.साधना तोत्रे व कु.सौम्या घुणकीकर यांनी खूप मेहनत घेतली.तसेच आपल्या विशिष्ट शैलीने श्री.महादेव कुले (गुरुजी) यांनी आपले विचार सभागृहासमोर मांडून प्रोत्साहन देण्याचे उत्तम काम केले. सदर कार्यक्रमाला डॉ.पंकज लोखंडे,श्री.सुभाष पाटील,श्री. अविनाश गायकवाड,श्री.रमेश भिंगारदिवे, श्री.वैभव कांबळे,श्री. गजेंद्र कांबळे.श्री.माणिक राऊत, श्री.राजेश कांबळे,सौ. ज्योत्सना अहिवळे,सौ. सुजाता बनसोडे,श्री.विकास पाटील,सौ.सोनल हाटे,सौ. सुरेखा गायकवाड,सौ.सविता उपाध्याय,कु.निकिता बोंबले, प्रीती कुलकर्णी,कु.नीता सपारिया तसेच बालकलाकार सम्राट घुणकीकर,वेदांग अहिवळे, जान्हवी तोत्रे,आयुष्य भट्टाचार्य,शरण्या बोडके,तसेच कुमारी.प्रांजल किशोर माने यांनी वंदे मातरम या गाण्यावरती उत्कृष्ट नृत्य सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकली. सौ.सॅन्ड्रा डीसोझा, सौ.रंजना पटेल, श्री.विनोद राठोड, श्री. सुभद्रा पाटील, सौ.लक्ष्मी राव, श्री.अशोक जाधव यांनी सुद्धा उपस्थिती दाखवली.शेवटी सर्वाचे आभार व्यक्त करत कार्यक्रमची सांगता करण्यात आली.

## राहुल सोनावळे यांची रिपाईच्या जिल्हा संपर्क प्रमुखपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या जिल्हा संपर्कप्रमुखपदी राहुल सोनावळे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. त्यांना मुंबई, कालिना येथील बैठकीत पक्षाचे कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे व मान्यवराचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. राहुल सोनावळे यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदान तसेच पक्षाच्या वाढीसाठी केलेले कार्य व योगदान हया अनुषंगाने यांची नेमणुक करती असल्याचे आहे. कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे यांनी या याप्रसंगी सांगितले.



राहुल सोनावळे यांच्या नियुक्तीने रिपाई कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या सुधागड तालुकाध्यक्षपदी गेली अनेक वर्षे प्रभावी कार्य करत असलेले राहुल सोनावळे हे त्यांच्या कार्यक्षमतेसाठी, जनतेशी दांडग्या संवादासाठी आणि तरुणांमधील प्रभावी नेतृत्वासाठी ओळखले जातात. सुधागड तालुक्यात त्यांनी राबवलेले सामाजिक उपक्रम, आंदोलने आणि संघटन कौशल्य ही त्यांच्या निवडीची ठोस कारणे ठरली आहेत. या नियुक्तीनंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सुधागड तालुका कार्यालयात त्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित कार्यकत्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांच्या निवडीने संपूर्ण सुधागड तालुक्यात जल्लोषचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नायगाव मध्ये ग्राम पंचायत व निकिता फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**
एक घर 'एक वृक्ष, या घोषवाक्याला अनुसरून पाटोदा तालुक्यातील नायगाव ग्राम पंचायत व निकिता फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नायगाव येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात परिसराच्या पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. गावकऱ्यांचा मोठा सहभाग आणि महिलांचा विशेष पुढाकार या मुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या कार्यक्रमास नायगावच्या लोकप्रिय व कार्यक्षम सरपंच सौ.मंजुषा संदीप कवठेकर यांनी मार्गदर्शन व सहभाग दिला. तसेच निकिता फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना कवठेकर यांनी उपक्रमामागील प्रेरणा विषद केली.




आणि फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकी विषयी माहिती दिली. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, ग्राम पंचायत सदस्य, तसेच गावातील बचत गटातील महिला, युवक मंडळे, ज्येष्ठ नागरिक व इतर प्रतिष्ठित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ औपचारिकतेत मर्यादित न राहता, खऱ्या अर्थाने जनसहभागातून घडून आला. कार्यक्रमाआधी वृक्षारोपणाच्या महत्त्वावर प्रबोधनपर भाषणे आयोजित करण्यात आली. पर्यावरण संतुलन, जमिनीची धूप थांबवणे, पर्जन्यमान वाढवणे आणि भविष्यासाठी स्वच्छ व हरित गाव निर्माण करण्याचे उद्दिष्ट यामागे असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले. नंतर गावातील शाळा परिसर, ग्राम पंचायत हद्द, रस्त्याच्या कडेला आणि इतर निवडक ठिकाणी अनेक प्रजातींची झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमाला गावातील विविध स्वयंसहायता बचत गटातील महिलांनी वृक्षारोपणात हातभार लावला. त्यांनी वृक्षांची निगा राखण्याची जबाबदारी ही स्वीकारली. हे कार्य महिलांच्या सामाजिक योगदानाचे उत्कृष्ट उदाहरण ठरले. ग्राम पंचायतीच्या पुढाकारामुळे आणि निकिता फाउंडेशनच्या सहकार्यामुळे नायगावमध्ये पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जात आहेत. या मुळे गावाचे नैसर्गिक सौंदर्य वृद्धिंगत होत असून, भविष्यात 'हरित नायगाव' ही संकल्पना प्रत्यक्षात येईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. वृक्षारोपणानंतर झाडांचे संगोपन व संरक्षण हे पुढील महत्त्वाचे पाऊल असल्याने ग्राम पंचायतीमार्फत विशेष समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे सरपंच सौ.मंजुषा कवठेकर यांनी सांगितले. फाउंडेशनच्या मदतीने झाडांना नियमित पाणीपुरवठा, गवत कापणी व संरक्षणासाठी स्थानिक युवकांच्या सहभागातून कार्यवाही होणार आहे. नायगाव ग्राम पंचायत व निकिता फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवण्यात आलेला वृक्षारोपण कार्यक्रम हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा दीर्घकालीन संकल्प आहे. जनसहभाग, महिला पुढाकार आणि सामाजिक संस्थेच्या सहकार्याचा आदर्श उदाहरण ठरलेला हा उपक्रम इतर गावांसाठी प्रेरणादायक ठरेल, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## प्रजापीता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विदयालय डोंबिवली सेंटरच्या वतीने रक्षाबंधन चा कार्यक्रम सोहळा संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

रक्षाबंधनाच्या शुभ प्रसंगी, डोंबिवली सेवा केंद्राने प्रेम आणि स्नेह भेटीचा कार्यक्रम आयोजित केला होता. देवाच्या स्मरणाने या कार्यक्रमाची सुरुवात केली. मनीषा बेन यांनी संस्थेची थोडक्यात ओळख करून दिली. त्यानंतर कलावती बेनने रक्षाबंधनाचे आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट केले आणि उमा बेनने शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणमहर्षी केशव भोईर, महादेव ढोकले सर समुपदेशक (ढोकले वर्ग) गांवदेवी शाळेचे प्राथमिक मुख्याध्यापक, घावट सर, निरंजन कदम, मुंब्रेश्वर मंदिराचे विश्वस्त निखिल शासन, नृत्य चिकित्सा प्रशिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी, सर्व भाऊ-बहिणींनी देवाच्या घराची राखी बांधली आणि सर्वांना शंक आणि आशीर्वाद कार्ड दिले. आमचे प्रतिनिधी दिनेश हुमणे डोंबिवली पश्चिम.



## चोरीच्या घटनांमध्ये वाढ, नागरिकांनी सतर्क

### रहावे लासलगाव पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



विंचूर : लासलगाव परिसरात अलीकडे घरफोड्या व चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळेस घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, याबाबत नागरिकांनी अधिक सजग राहावे, असे आवाहन लासलगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी केले आहे. कामानिमित्त बाहेरगावी जाताना घरात मौल्यवान वस्तू, रोख रक्कम किंवा दागिने ठेवू नयेत. तसेच दोन ते तीन दिवसांसाठी घर बंद ठेवून बाहेरगावी जाणार असल्यास, याची माहिती आपल्या शेजाऱ्यांना, मित्रपरिवाराला किंवा थेट लासलगाव पोलिस ठाण्यास द्यावी. तसेच, बँकेतून किंवा इतर ठिकाणाहून पैसे, दागिने घेऊन जाताना गोपनीयता पाळावी आणि आवश्यक ती काळजी घ्यावी. वयोवृद्ध नागरिक व महिलांनी प्रवासा दरम्यान अंगावर मौल्यवान दागिने परिधान करणे टाळावे. मोठ्या रकमेची वाहतूक करताना योग्य ती खबरदारी घ्यावी. कोणताही अनुचित प्रकार आढळल्यास किंवा संशयित व्यक्ती परिसरात फिरताना दिसल्यास तात्काळ लासलगाव पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा किंवा डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

## मुरुड बस स्थानकात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस चौकी स्थापन करण्याची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी /मोहम्मद पिंजारी**




मुरुड, ७ ऑगस्ट २०२५ – मुरुड शहरातील बस स्थानक हे जनता विद्यामंदिर, समाज जागृती विद्यालय, मुरुडेश्वर विद्यालय, छत्रपती संभाजी महाविद्यालय आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय या शैक्षणिक इ. संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे प्रवास केंद्र ठरले आहे. दररोज शेकडो विद्यार्थी याठिकाणी ये-जा करत असतात. मात्र, अलीकडील काही महिन्यांत बस स्थानक परिसरात घडणाऱ्या अनुचित घटनांमुळे विद्यार्थी, विशेषतः मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, काही उपद्रवी तरुणांकडून छेडछाड, हुज्जतबाजी आणि विनाकारण गर्दी करण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. परिणामी, पालक आणि शिक्षकांमध्ये अस्वस्थता आणि चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर मुरुडमधील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, आणि पालक वर्गाने प्रशासनाकडे बस स्थानकात कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याची ठाम मागणी केली आहे.

"पोलीस चौकी असल्यास विद्यार्थ्यांना मानसिक आधार मिळेल आणि उपद्रवी प्रवृत्तींना आळा बसेल," असे नागरिकांचे म्हणणे आहे. चौकीमुळे केवळ सुरक्षा वाढणार नाही, तर शिस्तीचाही भक्कम पायाभूत पाया बसलेला राहील, असेही मत व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा ही प्राथमिक गरज असून, प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी सध्या मुरुडमध्ये जोर धरत आहे

## राजापूर तहसीलदार कार्यालयातील कोषागार सहाय्यक महसूल अधिकारी मंगेश परांजपे आदर्श महसूल कर्मचारी पुरस्काने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)**



शहरातील कै. सुधा सुधाकर जोशी यांचे स्मृती प्रित्यर्थ्य त्यांचे सुपुत्र मिलिंद जोशी , दिलीप जोशी व प्रशांत जोशी यांनी यावर्षीपासून काही ठराविक रक्कम राजापूर तालुका महसूल कर्मचारी संघटनेकडे सूपूर्द केली असून, त्या रक्कमेकवरील व्याजाची रक्कम दरवर्षी महसूल कर्मचारी यांना आदर्श महसूल कर्मचारी देण्याचा मनोदय व्यक्त केला होता.

त्यानुसार सन २०२४-२५ करीता पहिल्या वर्षीचा पुरस्कार राजापूर तहसीलदार कार्यालयात कोषागार सहाय्यक महसूल अधिकारी पदावर कार्यरत मंगेश परांजपे यांना एक ऑगस्ट म्हणजेच महसूल दिनी राजापूर तालुका आदर्श महसूल कर्मचारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कारा अंतर्गत रोख रक्कम व प्रशस्तिपत्र असे पुरस्कराचे स्वरुप आहे.

श्री परांजपे हे सन २००७ पासून महसूल प्रशासनात कार्यरत असून, यापूर्वी ते तहसीलदार कार्यालय, गुहागर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय , रत्नागिरी येथे कार्यरत होते. सन २०१६ पासून ते तहसीलदार कार्यालय, राजापूर येथे सहाय्यक महसूल अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

राजापूर तालुक्यात परांजपे हे प्रामाणिक व कार्यतत्पर तसेच महसूल प्रशासनाची उत्तम जाण असणारे कर्मचारी म्हणून ओळखले जातात. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त पालोद येथील महाविद्यालयात क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-**

पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात येणाऱ्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. सात दिवस चालणाऱ्या या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. क्रीडा सप्ताहामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि सकारात्मकता वाढेल, व यातूनच उद्या तालुका व जिल्हा स्तराचे उत्कृष्ट खेळाडू निर्माण होतील असा विश्वास ज्ञानेश्वर काकडे यांनी व्यक्त केला. या क्रीडा सप्ताहात इयत्ता पाचवी ते बारावी वर्गातील विद्यार्थ्यांचे कबड्डी, खो-खो, रिले, धावणे, गोळा फेक, थाळी फेक, भालाफेक, लांब उडी, उंच उडी, कुस्ती वैयक्तिक व सांघिक मैदानी खेळ घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, प्रा एकनाथ जंजाळ, सुनील तांबे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, प्रफुल्ल कळम, कृष्णा पाटील, योगेश निंभोरे, भास्कर केरले, गजानन सपकाळ, विक्की चांदुरकर, गणेश दिवटे, राजाभाऊ भोसले, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी क्रीडा सप्ताहाचे नियोजन केले.



## शिक्षा अभियानातील समग्र कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्रश्न सोडवू -शिक्षण मंत्री दादा भुसे

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा :**
शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा शिक्षण विभागाचा आढावा संबंधी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्याचे औचित्य साधून समग्र शिक्षा कंत्राटी कर्मचारी महाराष्ट्र राज्य यांनी भेट घेतली. यापूर्वी संपूर्ण महाराष्ट्रातील समग्र शिक्षा अभियानातील एकूण 3105 कंत्राटी लोकांना कायम करण्यात आले त्या पद्धतीने उर्वरित 3050 लोकांना कायम करण्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. त्याबाबत शिक्षण मंत्र्यांनी लवकरच आपण समितीची सभा घेऊ आणि इतर राज्यात ज्या पद्धतीने समग्र शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले, त्या धरतीवर आपल्या महाराष्ट्रात देखील आपल्या या 3050 बांधवांना निश्चितच न्याय मिळवून देऊ अशी त्यांनी ग्वाही दिली. यात्रसंगी महिला भगिनींनी दादा भुसे यांना रक्षाबंधनानिमित्त राखी बांधली आणि त्यांनी राखीची भेट



निश्चितच देण्याचे कबूल सुद्धा केले. एकंदरीत आजच्या या शिक्षणमंत्र्याशी घडून आलेल्या भेटीचा निश्चितच सकारात्मक परिणाम घडून येईल अशी आशा सर्व समग्र शिक्षा अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिसून येत आहे. यामध्ये जवळजवळ 20 ते 25 वर्षापासून कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता, कार्यक्रम अधिकारी, संगणक प्रोग्रॅमर विषय साधन व्यक्ती, MIS COORDINATOR, डाटा एन्ट्री ऑपरेटर, रोखपाल असे 3050 लोक संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी सतत 25 वर्षापासून कार्य करीत आहेत. आज अनेकांचं सेवानिवृत्तीचे वय सुद्धा झालेले आहे. तरी उर्वरित कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आश्वस्त केले. यावेळी उपस्थित कर्मचारी सुनील मोटघरे, राम वाढीभस्मे, उज्वला बावनकार, संगिता भवसागर, रामरतन भाजीपाले, विरेंद्र गौतम, अर्चना बेदरकार, अर्चना गभने, मेघेश्वरी बिसेन, मंगला खोब्रागडे अनिल येले, कालिदास गहाणे, दीपाली बोरीकर, वैशाली नगराळे, श्रावन धांडे, प्रियंका लांजेवार, विवेक बोरकर, शुभ्रा कांबळे व जिल्ह्यातील समग्र शिक्षाचे कर्मचारी उपस्थित होते

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांची राजेंद्र नगर नांदेड येथील निवासस्थानी खतगावकर कुटुंबीयांची सांत्वन पर भेट



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - स्व.सौ.स्नेहलता भास्करराव पाटील खतगावकर यांचे दिनांक १ रोजी दुःखद निधन झाले.ही घटना समजताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी आदरणीय खतगावकर साहेबांसह समस्त खतगावकर कुटुंबीयांची सांत्वन पर भेट घेतली.राष्ट्रवादी काँगेस पार्टी आणि पवार कुटुंबीय खतगावकर कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत खतगावकर कुटुंबास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशा भावना व्यक्त केल्या.

याप्रसंगी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे,आमदार सतीश चव्हाण,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार अविनाशराव घाटे, सरजितसिंग गिल,व्यंकटराव पाटील गोजेगावकर,

प्रवीण पाटील चिखलीकर,दीपक पावडे,डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर,भास्कर भिलवंडे,राजू गंदीगुडे,साबीर चाऊस,अँड.जमीर पठाण,मोहसीन खान पठाण,डॉ.विक्रम देशमुख,राहुल हंबर्डे, जोगिंदरसिंग खैरा,जगन्नाथ सावकार चक्रावार, संभाजीराव देशमुख,शिवाजी पाटील जाधव,शिवाजी पाटील शिरूरकर,एन. डी.पवार,दिलीप सावकार कोडगिरे,अँड. बाळकृष्ण शिंदे,नाज शेख,यांच्यासह आमच्या कुटुंबातील सौ.ताराबाई भास्करराव पाटील खतगावकर,सौ.मंगलाबाई प्रभाकरराव पाटील खतगावकर,बाळासाहेब पाटील खतगावकर,डॉ. अनंत पाटील खतगावकर,सौ.प्रतिमाताई पाटील खतगावकर निरंजन पाटील खतगावकर,सौ. अरुणाताई अरुण पाटील,डॉ.अंजलीताई नितीन पाटील आगळे,प्रमोद पाटील खतगावकर,रवी पाटील खतगावकर,अतुल पाटील खतगावकर,सौ. शुभांगीताई रवी पाटील खतगावकर,सौ. अरुंधतीताई पाटील खतगावकर, अनिकेत देशमुख,सौ.मीनाक्षीताई शहाजी पाटील सोळंके,सौ.निशा देशमुख यांच्यासह परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## पुणे येथील पीडित मुलींच्या प्रकरणात दोषी पोलिसांवर कार्यवाही करा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :-योगेश पालोदकर**

: पुणे येथे संभाजीनगर जिल्ह्यातील एका पीडितेस सहकार्य केल्याचा राग मनात धरून तेथील मुलींना मारहाण व जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या पोलिस कर्मचारी आणि अधिकाऱ्याची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कडक कार्यवाही व्हावी, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उप विभागीय महसूल अधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आले. उप विभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार श्रीमती व्ही. बी. उप्पलवाड यांनी निवेदन स्वीकारले.



निवेदनात म्हटले आहे, या प्रकरणात पीडित व्यक्ती असलेल्या मुलींना न्याय मिळवून देण्यासाठी गृहमंत्री म्हणून आपण तत्काळ हस्तक्षेप करावा, जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यास अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यानुसार भारतीय न्याय संहिते अंतर्गत गुन्हे दाखल करावेत. सासरच्या छळाने आश्रयासाठी आलेल्या मूळ पीडित मुलीस संरक्षण आणि सुरक्षिततेची हमी द्यावी. आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संविधानिक मार्गाने राज्यभर जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आलेला आहे.

निवेदनावर जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, सिल्लोड शाखा कार्याध्यक्ष डॉ. प्रकाश बिऱ्हाडे, प्रधान सचिव नारायण फाळके, जगदीश बेदवे, प्रा. डॉ.अनिरुद्ध मोरे, अशोक जाधव, प्रल्हाद पगारे, सुधाकर गायकवाड, रवी गायकवाड, दशरथ सुरडकर, डी. के. सुरडकर, संतोष बोराडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तुकाराम जगताप यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):**



-पंढरपूर तालुक्यातील आव्हे येथील तुकाराम दाजी जगताप यांचे वयाच्या १०४व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.ते बापू या नावाने सर्वपरिचित होते. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच पंढरपूर,आटपाडी, सांगोला, माळशिरस तालुक्यातील आप्तस्वकीय, पाहुणेरावळे, सगेसोयरे यांनी अंत्यदर्शनासाठी बहुगर्दी केली. सर्व उपस्थितांनी अंत्यदर्शन घेतले व त्यांच्या मनमिळावू स्वभावाचे सर्वांनी कौतुक करून तरुणाई मध्ये त्यांनी पैलवानकीचा शौक जोपासला होता सोबतच भजन आणि कीर्तनाचा त्यांना छंद असल्याचे बोलून दाखवले.त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाल्याचेही सांगितले. . त्यांच्या पश्चात पत्नी ,एक मुलगी, एक जावई ,तीन मुले नातवंडे, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे.ते पत्रकार रघुनाथ देवकर यांचे सासरे होत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त...! वरखेडी नगरीत अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी  समाधान पाटील**
**एरंडोल तालुक्यातील**

वरखेडी, नगरीत श्री कुष्ण जन्माष्टमी निमित्ताने वरखेडी नगरीत अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह शनिवार दि .09/08/2025 रोजी ग्रामस्थ मंडळी आयोजित करण्यात आले आहे  तरी सर्व भाविक भक्तांना कळविण्यास आनंद होतो की, आमचे येथे सालाबादाप्रमाणे यंदाही श्री प्रभु रामचंद्र यांच्या कृपेने, साधुसंतांच्या कृपाआशिर्वादाने तसेच मठाधिपती, ह. भ. प. श्री. गोविंद महाराज, केकतलिभोरेकर (श्रीक्षेत्र पंढरपूर) यांच्या कुशल मार्गदर्शनाने व ग्रामस्थ मंडळी आणि समस्त भजनी मंडळ यांच्या बहुमोल सहकार्याने अखंड हरीनाम संकिर्तन सप्ताह आयोजित केलेला आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी प्रवचन श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा ही विनंती.

दैनंदिन कार्यक्रमः संध्याकाळी ५ ते ६ हरीपाठ, रात्री ९ ते ११ नामसंकिर्तन.

मिती भावन पोर्णिमा, दि. ०९/०८/२०२५, शनिवार रोजी
ह.भ.प.श्री. चिंतामण महाराज (आडनांवकर) याचे किर्तन
मिती श्रावण कृ. १, दि. १०/०८/२०२५, रविवार रोजी
ह.भ.प. भागवताचार्य
सौ. शैलाताई महाराज (अवधान, धुळे) यांचे किर्तन
मिती श्रावण कुर. २, दि. ११/०८/२०२५, सोमवार रोजी
ह.भ.प.श्री. स्वप्नील महाराज (निरडकर) यांचे किर्तन
मिती धावण कृ. ३. दि. १२/०८/२०२५, मंगळवार रोजी
ह.भ.प. श्री. प्रल्हाद महाराज (कळमसरा) यांचे किर्तन
वर्ष२४ वे
निती श्रावण कृ. ४/५. दि. १३/०८/२०२५, बुधवार रोजी
ह.भ.प.अन्नदाता श्री.
ऋतुजाताई महाराज (कोठलीकर)
विती श्रावण कृ. १, दि. १४/०८/२०२५, गुरुवार रोजी
ह.भ.प.श्री. राजेंद्र महाराज (केकत निंभोरा)
मिती श्रवण कृ. ४. दि. १५/०८/२०२५, शुक्रवार रोजी
ह.भ.प. श्रीकृष्ण उम्माचे किर्तन सत्री १० ते १२.
श्री. गोविंदा महाराज (केकत निंभोरा)
मिती श्रवण कृ. ८, दि. १६/०८/२०२५. शनिवार रोजी
ह.भ.प. काल्याचे किर्तन सकाळी ११
श्री. गोविंदा महाराज (केकत निंभोरा)
महाप्रसाद कार्यक्रम : शनिवार दि. १६/०८/२०२५ रोजी दुपारी १२ ते ३ पर्यंत.
मृदंगाचार्य :- श्री अनिल माहाराज (बाम्हणे)
गायनाचार्य :- श्री दिनकर माहाराज (बोरगाव)
हामीनियम वादक :- श्री कल्याण माहाराज (आडगाव)
साऊंड सिस्टीम संतकृपा साऊंड, आडगांव
आपले नम्र
ह.भ.प.वरखेडी नगरीतील समस्थ ग्रामस्थ मंडळी
उपस्थित भजनी मंडळ
बजरंग गृर्प, पवनराजे गृप, शिवराजे गृप,
ह. भ. प. भजनी मंडळ खडके,
उमदे खेडगांव तांडा, नागदुली.
ह. भ. प. समस्थ ग्रामस्थ,
* *संकिर्तन स्थळ * हनुमान मंदीर, वरखेडी ता. एरंडोल*



दैनिक युवक आधार – मा. नामदार मंत्री महाराज शिवेंद्रराजे भोसले सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे वैकुंठ पाटील यांच्या हस्ते जोरदार स्वागत करण्यात आले. त्यावेळी विधानसभेतील मुंबई गोवा महामार्गावर पेण साठी अंडरपास सर्विस रोड संदर्भात चर्चा करून काही निवेदन दिले.मुंबई गोवा रस्त्यवर पेण तालुक्यतील वाशी, खारेपाट भागात 18 गावे आणि 14 वस्त्या आहेत व तेथून अनेक वाहने ये – जा करतात वाशी नाक्यावर उड्डाण पुल नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असुन तेथे वाहतुक कोंडीचा सामना करावा लागतो तरी वाशी नाक्यावर उड्डाणपुल व्हावा यासाठी विनंती केली. त्याच प्रमाणे डोलवी गाव जवळ अंडरपास ची नितांत गरज आहे. तसेच महामार्गावरून भरधाव गाड्या धावत असल्यने सर्व्हिस रोड पण आवश्यक आहेत.पेण तालुक्यतील खरोशी, दुरशेत, आंबिवली, धोंबी, पाडापूर, निगडे, कलोटी या महामार्ग वरील गावाजवळ सर्व्हिस रोड व्हावे यासाठी निवेदन दिले.

## आशिर्वाद गोविंदा पथकाची दमदार कामगिरी यंदा नऊथर लावल्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई  प्रविणभाऊ पवार**

मुंबई वाकोला सांताक्रूझ पूर्व येथील चक्कीखाण विभागातील सांताक्रूझची माऊली हे गेली पस्तीस वर्षांपूर्वीचे जुने मंडळ असून सद्या तीन वर्षांपासून आर्शिवाद गोविंद पथक चालवत आहे. या तीन वर्षांच्या काळात त्यांनी दमदार कामगिरी करुन मंडळ नावारूपाला आला आहे.

मंडळाचे प्रमुख व्यवस्थापक आंबाजी पोईकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे गोविंद मंडळ उत्कृष्ट कामगिरी करत आहे. अगदी कमी वर्षात त्यांनी गरुडझेप घेतली आहे. या गोविंद पथकात लहान मुलांपासून, युवक व वयोवृद्ध व्यक्ती पण सहभागी होत असतात.

या गोविंदा पथकांची कामगिरी पाहून विभागातील अनेक सामाजिक व राजकीय पदाधिकारी यांना मदत सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेण्यात कमीपणा नसतो. त्यातलाच एक भाग म्हणजे उपशाखाप्रमुख संदिप देसाई व अखिल भारतीय मराठा महासंघ मुंबई उपाध्यक्ष, जनराज्य विकास परिषद चे अध्यक्ष अशोकराव देसाई हे गेली अनेक वर्षे या गोविंदा पथकांला मदतीचा हातभार लावून त्यांना सहकार्य करत असतात.



# गव्हाण विद्यालयाची श्री शिवसमर्थ स्मारकास क्षेत्रभेट !

## विद्यार्थ्यांनी घेतली शिवकालीन शौर्याची विलक्षण अद्भुत अनुभूती...

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

पनवेल गव्हाण – महाराष्ट्राचे आराध्य दैवत,हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक राजाधिराज श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची शौर्य गाथा आणि त्यांचे आध्यात्मिक गुरू समर्थ रामदास स्वामी यांची भक्तीमय शिकवण अशा ' शक्ती आणि भक्तीचा ' अद्वितीय मिलाफ असणाऱ्या ' श्री शिव समर्थ स्मारक ' व शिवसंग्रहालय ह्या दास्तान फाटा,ता.उरण येथील ऐतिहासिक वारसा समृद्ध करणाऱ्या शिल्प स्मारक स्थळी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या गुरुकुल विभागाची तिसऱ्या टप्प्यातील क्षेत्रभेट मंगळवार दि.५ ऑगस्ट २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाली.





ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ( जे.एन.पी.टी.) च्या वतीने दास्तान फाटा येथे पावणेदोन एकर क्षेत्रात उभारण्यात आलेल्या ७२ फूट उंचीच्या स्मारकाच्या चौथ्या माळ्यावरील महाराजांचे १९ फूट उंचीचे उभे व समर्थ रामदास स्वामींचे १४ फूट उंचीचे बैठकावस्थेतील पाच टन वजनाचे भव्य चित्ताकर्षक व रोमहर्षक पंचधातूशिल्प म्हणजे विलोभनीय शिवसमर्थ स्मारकाचा परमोच्च कळस जणू शिवशौर्य आणि आध्यात्मिक मिलाफाचा मानबिंदू असल्याची प्रकर्षाने अनुभूती येणारे प्रेरणास्थळ !

श्री.शिवसमर्थ स्मारक भेटी दरम्यान विद्यालयातील इयत्ता सातवी व आठवी च्या विद्यार्थ्यांनी महाराजाधीराज श्री छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या अतुलनीय शौर्याची साक्ष देणारी व इतर देशभक्तांच्या राष्ट्रभक्तीने ओथंबलेली ऐतिहासिक चित्रफलके ( कॅनव्हास पेंटिंग्ज ) व त्रिमितीय चित्रशिल्पे पाहून विद्यार्थी ऐतिहासिक पराक्रम व देशभक्तीच्या वातावरणात भारावून गेले.महाराजांनी कोकण परिसर व किनारपट्टीवर ब्रिटीशांनाही अचंबित करणारे आणि शत्रूला धडकी भरवणारे असे स्वराज्यात उभारलेले आरमार,बहिर्जी नाईकांच्या नेतृत्वाखालील हेरगिरी आदी शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या महापराक्रमाची गाथा सांगणारे चित्र शिल्प संग्रहालय,भारावलेले वातावरण आणि गाईड प्रशांत पाटील यांच्या ओघवत्या वाणीतील महाराजांची प्रजाहितदक्षता आणि स्वराज्यातील मायबहिणींच्या अब्रु रक्षणासाठी आईसाहेब जिजाऊंच्या संस्करातून पक्की झालेली मनोभूमिका तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या देवबोली संस्कृत भाषेतील पांडित्य आणि १९ भाषांवरील प्रभुत्व आणि धर्मरक्षणार्थ मरणप्राय यातना सोसणाऱ्या निधड्या छातीच्या ह्या छाव्याचा प्रत्यक्ष मृत्यूलाही घाबरवणारा बेदरकार करारी बाणा इत्यादी विलक्षण,अद्भूत ऐतिहिसिक माहिती ऐकून विद्यार्थी रोमांचित झाले.यावेळी विद्यार्थ्यांना छावा चित्रपटातील काही दृश्ये तसेच स्मारक संग्रहालयातील शिल्पांची माहिती सांगणारा मिहितीपट दाखवण्यात आला.

इतिहासाच्या शिवशौर्यकालीन सामर्थ्याचे विलक्षण प्रत्ययकारी व अंतर्मूख करणारे दर्शन घडवणाऱ्या ह्या क्षेत्रभेटीत विद्यालयातील इयत्ता सातवी व आठवीच्या १२५ विद्यार्थ्यांसोबत उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,गुरूकुल वर्गांच्या दोन्ही वर्गशिक्षिका प्रतिज्ञा घरत व दर्शना माळी,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे व शितलकुमार म्हात्रे आदींचा समावेश होता.

श्री शिव समर्थ स्मारकाचे गाईड प्रशांत पाटील आणि आणि तिकीट कलेक्टर श्रद्धा घरत व इतर कर्मचाऱ्यांचे उस्फूर्त सहकार्य लाभले.

विद्यालयाच्या प्राचार्या जोत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही क्षेत्रभेट यशस्वी झाली.


ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी शिव समर्थ स्मारकाच्या व्यवस्थापनाचे व सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांना धरून

### नागपूर येथील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोर 14 ऑगस्ट पासून आमरण उपोषण करणार -माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -**

आपण निवडणूक दरम्यान आपल्या पक्षाच्या घोषणापत्र मध्ये शेतकऱ्यांना कर्ज माफी करण्याचे आश्वासन दिले होते .परंतु अजून पर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही. अतिदृष्टी ,अवकाळी पाऊस, नैसर्गिक आपत्ती, धान उत्पादन वाढता खर्च, अशा अनेक कारणापायी राज्यातील शेतकरी कर्जबाजारी होऊन शेतकरी आत्महत्येचे प्रमाण अधिकच वाढत आहे. विधानमंडळाच्या सन 2024 च्या हिवाळी अधिवेशनात नोंदणीकृत शेतकऱ्यांनी धान विक्री केली असो किंवा नसो अशा धान उत्पादकांना हेक्टरी 20000 हजार याप्रमाणे प्रोत्साहन पर राशी बोनस देण्याची घोषणा केली होती व दिनांक 25 मार्च 2025 रोजी प्रोत्साहन पर राशी देण्याबाबतचे पत्रक सुद्धा काढण्यात आले. परंतु अजून पर्यंत नोंदणीकृत शेतकऱ्यांना बोनस चे पैसे देण्यात आले नाही . बोनसचे पैसे तात्काळ नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे ह्या प्रमुख मागणीसह खालील मागण्यांना घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानासमोर 14 आगस्ट 2025 पासून धान उत्पादन शेतकऱ्यांचे आमरण उपोषण आंदोलन सुरू करण्यात येईल. यात प्रमुख मागण्यांमध्ये शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, नागपूर हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणेप्रमाणे धान उत्पादन नोंदणीकृत शेतकऱ्यांना तात्काळ बोनस देण्यात यावे ,उन्हाळी धानाचे चुकारे देण्यात यावे व धान खरेदीची मुदत वाढविण्यात यावी याबाबतचे निवेदन माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी भंडारा, नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर शहर नागपूर ,तहसीलदार तहसील कार्यालय लाखांदूर, पोलीस निरीक्षक सीताबर्डी पोलीस स्टेशन नागपूर ,पोलीस निरीक्षक शंकर नगर पोलीस स्टेशन नागपूर ,पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन दिघोरी यांना पाठविण्यात आलेल्या पत्रातून केलेली आहे.




## पिंपळपाडा (घोट) येथे नवीन अंगणवाडीचे उद्घाटन* व *वृक्षारोपण* सोहळा – *दानशूर श्री विनोद दादा पाटील* यांच्या पुढाकाराने एक प्रेरणादायी उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**विठ्ठल वाव्हळे घोट गाव (पिंपळपाडा)***

येथे समाजहितासाठी झटणाऱ्या आणि अनेक सामाजिक उपक्रमांत अग्रभागी असणाऱ्या *श्री विनोद दादा पाटील* यांच्या सौजन्याने व स्वखर्चाने नव्याने उभारलेली अंगणवाडी आज ग्रामस्थांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आली.

या उद्घाटनाचा विशेष योग पनवेलचे कार्यसम्राट व जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे *आमदार मा. श्री प्रशांत दादा ठाकूर* यांच्या ५० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने साधण्यात आला. त्यामुळे या कार्यक्रमाला सामाजिक व प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक श्री विनोद दादा पाटील* होते. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, > "ही अंगणवाडी केवळ एक इमारत नसून, हे भविष्यातील पिढ्यांच्या शिक्षणाचे केंद्र आहे. लहानग्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवण्यासाठी मी सदैव सज्ज आहे.

या कार्यक्रमात अंगणवाडीच्या परिसरात सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपण देखील करण्यात आले. लहान मुलांसाठी खेळणी, शिक्षण साहित्य आणि इतर सुविधा अंगणवाडीत पुरवल्या जातील, असे आश्वासन *पाटील* यांनी दिले. या कार्यक्रमासाठी घोट गावचे *माजी सरपंच श्री हरिदासभाई पाटील, तसेच श्री दिलीप पाटील, श्री गिरीश पाटील, श्री शंतनु पाटील, श्री ज्ञानेश्वर पाटील, श्री वैभव भोईर, श्री लहू पाटील, श्री समीर गोंधळी, श्री चंद्रकांत पाटील, श्री एकनाथ कोळी* व इतर मान्यवर उपस्थित होते. अंगणवाडीतील शिक्षिका व सेविका, तसेच गावातील स्त्री शक्तीचा भक्कम सहभागही या कार्यक्रमात दिसून आला. लहानग्यांचे हसरे चेहरे आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे उत्तम प्रतीक ठरले. कार्यक्रमाचे सुरेख व सुबोध सूत्रसंचालन *श्री अमित लांभाते सर* यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित सर्वांचे आभार *श्री विठ्ठल भाऊ वाव्हळे* यांनी अत्यंत मनापासून व्यक्त केले.

--

हा उपक्रम घोट गावासाठी अभिमानास्पद असून, समाजातील प्रत्येकाने अशा कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा यातून नक्कीच मिळते.



# शिवसेना (उबाठा) पक्षाकडून कामोठ्याच्या रस्त्यावरील खड्यामध्ये रांगोळी काढून अनोखे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

कामोठे वसाहतीमधील रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून संताप व्यक्त करत महानगरपालिकेच्या अनागोंदी कारभाराचा निषेध करण्यासाठी कामोठ्याच्या रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये रांगोळी काढून शिवसैनिकांनी अनोखे आंदोलन छेडले. त्यानंतर महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेवून त्वरित खड्डे बुजविण्याची मागणी करण्यात आली.

शिवसेना शहर कामोठे शहरप्रमुख रामदास गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे विभागातील मानसरोवर स्टेशन पासून कामोठे सेक्टर -6 महामार्ग पर्यंत रस्ते दुरुस्तीचे काम चालू केले होते ते काम तुह्मी अपूर्ण अवस्थेत ठेवलं



असून तिकडे खूप मोठ्या प्रमाणात खडे पडले आहेत आणि रोड वरचे डांबर निघून माती मध्ये रूपांतर झाले आहेत आणि मातीचा मोठ्या प्रमाणात धूर तयार होउन नागरिकांना श्वास घ्याचा त्रास होत आहे . रोडवरच्या खड्यामुळे येणारे जाणारे वाहन त्या अडकून राहून वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर सिमेंटचे कॉंक्रेट करून रोड दुरुस्ती पूर्ण करावे. याकरिता आज कामोठे उपशहरप्रमुख सचिन मनोहर त्रिमुखे यांनी कार्यकारी अधिकारी दशरथ भंडारी पनवेल महानगर पालिका कामोठे इथे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी महानगरप्रमुख अवचित राऊत, कामोठे शहरप्रमुख रामदास गोवारी, कामोठे शहरसंघटक संतोष गोळे, उपशहरप्रमुख गणेश खांडगे, दीपक पाटील, उपविभागप्रमुख प्रशांत आनंदे, सचिन दाईंगडे, शहर संघटक संजय जंगम, मयुर सपकाळ, साहील जोशी, उपजिल्हा संघटीका सौ रेवती सपकाळ, उपतालुका संघटीका सौ मीना संजय सदरे, शहर संघटीका कामोठे सौ संगीता राऊत, उपहशहरप्रमुख सौ सुरेखा पंजाबराव जाधव, उपशहर संघटीका सौ स्मिता सुनील लागे, विभाग संघटीका सौ मीनाक्षी कैलास कांबळे, शाखा संघटीका सौ लीला बाळकृष्ण जामदार, सौ हर्षदा पाटील यांच्यासह महिला आघाडी युवासेना आणि शिवसैनिक पदाधिकारी आणि विविध सोसायटीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. सदर काम लवकर न केल्यास 13/08/2025 रोजी एक दिवसीय लाक्षणीय उपोषण व आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेकडून देण्यात आला.

# अमेरिकन कर कात्रीत कपडा उद्योग

## भारतीय छोट्या कंपन्यांसाठी मृत्यूची घंटा ठरू शकतो : एईपीसी ■ सरकारकडून तत्काळ आर्थिक मदतीची मागणी

**नवी दिल्ली :** ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर दुप्पट करणे सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसाठी, विशेषतः अमेरिकन बाजारपेठेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या उद्योगांसाठी मृत्यूची घंटा ठरेल. त्यामुळे सरकारने तत्काळ आर्थिक मदत करावी, असे कपड्यांच्या निर्यातदारांची संघटना 'एईपीसी'ने गुरुवारी म्हटले आहे.



केंद्रित कपड्यांच्या निर्यात प्रोत्साहन परिषदेचे (एईपीसी) अध्यक्ष सुधीर शेखरी म्हणाले की, अमेरिकेची वरील घोषणा ही कामगार-केंद्रित निर्यात उद्योगासाठी एक मोठा धक्का आहे. उद्योग हे सहन करू शकत नाही. मला खात्री आहे की सरकारला हे देखील कळले असेल की शुल्कातील ही अवास्तव वाढ सूक्ष्म आणि मध्यम वस्त्र उद्योगांसाठी - विशेषतः जे प्रामुख्याने अमेरिकन बाजारपेठेत विक्री करतात, त्यांच्यासाठी मृत्यूची घंटा ठरेल, जोपर्यंत सरकार या उद्योगाला थेट आर्थिक मदत देणार नाही, असे ते म्हणाले.


भारतीय तयार कपड्यांच्या निर्यातीसाठी अमेरिका ही एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. २०२४ मध्ये भारताच्या एकूण कपड्यांच्या निर्यातीपैकी अमेरिकेचा हिस्सा ३३ टक्के आहे. २०२४-२५ मध्ये, भारताच्या या क्षेत्रातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत कपड्यांपासून बनवलेले (२.७ अब्ज अमेरिकन डॉलर), कपड्यांपासून बनवलेले (२.७ अब्ज अमेरिकन डॉलर) कपडे आणि कापड (३ अब्ज अमेरिकन डॉलर) यांचा समावेश आहे.

अमेरिकेच्या कपड्यांच्या आयात बाजारपेठेत भारताची उपस्थिती वाढली आहे. २०२० मध्ये त्याचा वाटा ४.५ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ५.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि अमेरिकेला जाणाऱ्या अव्वल आरएमजी निर्यातदारांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे, असे सेखरी म्हणाले.

६ ऑगस्ट रोजी वॉशिंग्टनने सर्व भारतीय आयातीवर २५ टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली, ज्यामध्ये सध्याच्या २५ टक्के शुल्काव्यतिरिक्त एकूण कर २७ ऑगस्टपासून ५० टक्के झाला आहे. व्हाईट हाऊसने म्हटले आहे की हे उपाय भारताने रशियन तेलाची सतत खरेदी करत राहिल्याने प्रत्युत्तर म्हणून आहेत.


## कापड, चामड्याच्या कंपन्यांचे समभाग घसरले

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेलाच्या आयातीमध्ये वाढ केल्यामुळे भारतीय वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादल्यानंतर गुरुवारी कापड आणि चामड्याशी संबंधित शेअर्समध्ये घसरण झाली.



बीएसईवर अरविंद लिमिटेडचा शेअर २.६४ टक्के, केपीआर मिलचा शेअर २.२५ टक्के, इंडो काउंट इंडस्ट्रीजचा शेअर २.१८ टक्के, पर्ल ग्लोबल इंडस्ट्रीजचा शेअर १.९८ टक्के, लक्स इंडस्ट्रीजचा शेअर १.३८ टक्के, पेज इंडस्ट्रीजचा शेअर १.१६ टक्के आणि डॉलर इंडस्ट्रीजचा शेअर ०.५६ टक्के घसरला.

लेदर स्टॉकमध्ये एकेआय इंडिया ४.७३ टक्के, झेनिथ एक्सपोर्ट्सचा शेअर ४.११ टक्के, खादिमचा शेअर १.७७ टक्के, सुपरहाऊस लिमिटेडचा शेअर १.२४ टक्के आणि मेट्रो ब्रँड्सचा शेअर १.१३ टक्के घसरला. तसेच, झील अ‍ॅक्वा ३.८१ टक्क्यांनी, अ‍ॅपेक्स फ्रोझन फूड्स २.९८ टक्क्यांनी, अवंती फीड्स (२.२७ टक्के) आणि वॉटरबेस (२ टक्के) यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली.



## भारतीय औषध उत्पादनावर शुल्क आकारल्यास फटका अमेरिकन ग्राहकांना बसेल : फार्मेक्सिल

**नवी दिल्ली :** भारतीय औषध निर्यातीला तात्पुरते वाढीव शुल्कातून सवलत देण्याचा अमेरिकेचा निर्णय अमेरिकन लोकसंख्येसाठी परवडणारी औषधे सुनिश्चित करण्यात भारताच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा पुनरुच्चार करतो, असे फार्मास्युटिकल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल (फार्मेक्सिल) ने गुरुवारी म्हटले आहे. ६ ऑगस्ट रोजी अमेरिकेने सर्व भारतीय आयातीवर २५ टक्के अतिरिक्त शुल्क जाहीर केले, ज्यामध्ये विद्यमान २५ टक्के शुल्काव्यतिरिक्त एकूण शुल्क ५० टक्के झाले आहे. भारत अमेरिकेत वापरल्या जाणाऱ्या ४० टक्क्यांहून अधिक जेनेरिक औषधांचा पुरवठा करतो, ज्यामध्ये जुनाट आजार, कर्करोग आणि संसर्गजन्य आजारांवरील उपचारांचा समावेश आहे. भारतीय औषधांवरील शुल्क प्रतिकूल परिणामकारक ठरेल, ज्यामुळे शेवटी अमेरिकन ग्राहकांना भार पडेल. भारतीय कंपन्या कमी किमतीच्या जेनेरिक औषधांचे उत्पादन करतात - उच्च-मार्जिन उत्पादने नाहीत - म्हणून कोणताही शुल्क खर्च थेट अमेरिकन ग्राहकांना जाईल, असे फार्मेक्सिलचे अध्यक्ष नमित जोशी यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

## *रक्षाबंधन निःस्वार्थ प्रेम, एकता आणि पवित्र तेचा उत्सव.---बीके रुख्मिणी*

**दैनिक युवक आधार**
**रिसोड /प्रतिनिधी :-**

रणजीत सिंह ठाकुर प्रजापीता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय तेल्हारा येथे 3 ऑगस्ट च्या सायंकाळी संचालिका ब्रह्माकुमारी प्रमिला दीदी यांच्या मार्गदर्शखाली रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. अकोला-वाशीम ब्राह्मकुमारीज प्रमुख राजयोगी ब्रह्माकुमारी रुख्मिणी दीदीजी व ब्रह्माकुमारी सुमन दीदीजी यांच्या उपस्थितीत रक्षाबंधन उत्सव साजरा करण्यात आला.रुख्मिणी दीदींनी उपस्थित भाऊ बहिणींना रक्षाबंधनाचे आध्यत्मिक महत्व व रहस्य सांगितले. रक्षाबंधन हा निःस्वार्थ प्रेम, एकता, पवित्रता आणि परिवर्तन याची स्मुर्ती व साक्ष देणारा भारतातील मोठा उत्सव आहे. बहिणीने भावाला रक्षा सुत बांधून पवित्र नात्याला व विश्वासाला जोपसण्याचे अभिवचन दिले जाते. तसेच आत्मिक स्वरूपाने विचार केल्यास सृष्टीतील सर्व मनुष्य एकाच परमात्म्याची मुलं आहेत त्यामुळे भाऊ भाऊ आणि बहीण भाऊ या नात्याने त्यांना एकाच विचाराने बांधून ठेवण्याचे श्रेष्ठ कार्य रक्षाबंधन निमित्त केले जाते.राखी बांधण्यापूर्वी स्मुर्ती चा तिलक लावून आपण देविदेवता असल्याची स्मुर्ती दिली जाते आणि त्यादिशेने परिवर्तन होण्यासाठी ब्रह्माकुमारीज राजयोग प्रत्येक मनुष्याला समजवीण्याची सेवा करीत आहे.ब्रह्माकुमारीज परिवार हा समाज उन्नतीसाठी प्रेरक असून आपण तशी स्मुर्ती ठेवावी असे मनोगत रुख्मिणी दीदींनी व्यक्त केले.ब्रह्मा कुमारीज मुख्यालय माउंट अबू राजस्थान म्हणजे मधुबन वरून सर्वांसाठी आलेली राखी प्रदर्शित करून ईश्वरीय संदेशाचे वाचन केले.संचालिका प्रमिला दीदींनी स्मुर्ती तिलक लावून आदरणीय रुख्मिणी दीदींच्या हस्ते सर्वांना राखी बांधून सुमन दीदींच्या हस्ते टोली वाटण्यात आली. प्रसंगी तेल्हारा सेवा केंद्र व गीता पाठशाळेचे भाऊ बहिणी मोठया संख्येने उपस्थित होते.



# मंत्रालय स्तरावर बैठक घेऊन महत्वाचे प्रश्न मार्गी लावणार -- ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले

### महामार्गावरील त्रुटी व समस्यांसाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देणार

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

अनेक वर्षांपासून रखडलेले आणि सध्या कासव गतीने चालू असलेले मुंबई-गोवा महामार्गावरील कासु ते इंदापूर कामाची गुरुवार 07 ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पाहणी केली. या दौर् यानिमित्त ते नागोठणे येथील हॉटेल कामथ येथे थांबले असता नागरिकांनी दिलेल्या निवेदनानंतर महामार्गाच्या त्रुटी व समस्यांसाठी संबंधित खात्याच्या अधिकार्यांना बोलावून पुढील आदेश देण्यात येतील तसेच महत्वांच्या विविध विषयांवर मंत्रालय स्तरावर एक बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जि.प. माजी सदस्य किशोर जैन,उपसरपंच अकलाक पानसरे,माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक,सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे व संतोष नागोठणेकर,ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे यांच्यासह अजगर मुल्ला,चंद्रकांत गायकवाड,आनंद लाड, धनंजय जगताप, दिनेश घाग, भरत गिजे, प्रवीण ताडकर,अनिल महाडिक यांच्यासह शासकीय अधिकारी व नागरिक उपस्थित होते.



यावेळी नागोठणे विभागातील नागरिकांनी महामार्गावर असलेले खड्डे,निष्कृष्ट दर्जाचे रस्ते व उड्डाण पूल,मिरानगर येथील उड्डाण पूलाला पडलेले भगदाड,शहरात जाण्यासाठी सर्व्हिस रोड,रस्त्या लगत झालेली अतिक्रमणे याबद्दल चर्चा करीत निवेदन दिले. यासोबतच किशोर जैन यांनी महाड,चिपळूण येथे नदीची खोली वाढवून किनारे बंदिस्त झाल्याप्रमाणेच नागोठणे शहरात दरवर्षी येणारा पुर येऊ नये यासाठी अंबा नदीची खोली वाढवून तिच्या किनाऱ्याची बंदिस्ती करावी तसेच दरवर्षी पावसाळ्यात पुर स्थितीत किनाऱ्या लगतच्या नागरिकांना तात्पुरते स्थलांतरित करावे लागते त्यासाठी शासनाचे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन योजने अंतर्गत नागोठणे येथे बहू उद्देशीय इमारत मंजूर करण्याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी मंत्री महोद्यांनी महामार्गावरील असलेल्या त्रुटी व समस्यांसाठी संबंधित खात्याच्या अधिकार्यांना बोलावून पुढील आदेश देण्यात येतील तसेच इतर महत्वांच्या विविध विषयांवर मंत्रालय स्तरावर आ. रविशेठ पाटील व येथील नागरिकांच्या समवेत एक बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावणार असल्याचे सांगितले.

# डोंगरगाव येथे गोठ्याला आग,शेती उपयोगी साहित्य जळून खाक

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

राळेगावः-अचानक लागलेल्या आगीत गोठा संपूर्ण जळून खाक झाला असून यात दोन जनावरे भाजून गंभीर जखमी झाले. ही घटना राळेगाव तालुक्यातील डोंगरगाव येथे दि.७ ऑगस्टला रात्री अंदाजे १ च्या दरम्यान घडली असून यात शेतीविषयक साहित्य जळाल्याने शेतकऱ्याचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.तालुक्यातील डोंगरगाव येथील शेतकरी लक्ष्मण रामभाऊ उरकुडे यांच्या शेतातील गोठ्याला रात्री अचानक आग लावली. गोठा आगीच्या भक्ष्यस्थानी पडुन आगीच्या झळा बसताच गोठ्यातील बैल दावे तोडून सैरावैरा पळू लागली मात्र आगीच्या झळाणे दोन्ही बैल भाजल्याने गंभीर जखमी झाले आहे. तर गोठ्यातील पाईप ३०,नोझल १४,पंप ४,खत ५० बॅग,युरिया १० बॅग,कीटकनाशक औषध हे संपूर्ण शेती उपयोगी साहित्य आगीत जळून खाक झाले आहे. त्यामुळे शेतकरी लक्ष्मण उरकुडे यांचे सुमारे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. सकाळी घटनेची माहिती शेतकऱ्यांनी संबंधित तलाठ्याला दिली मात्र घटना घडून पूर्ण दिवस गेला तरीपण तलाठ्याने घटनास्थळाला भेट दिली नाही फक्त फोनवर माहिती विचारून मी पंचनामा करीत असल्याचे सांगितले.यावरून शेतकऱ्याने तलाठ्यावर नाराजी व्यक्त केली असून त्यामुळे कामात हयगय करणाऱ्या तलाठ्याकडे वरिष्ठांनी लक्ष केंद्रित करून कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



# श्री गुरु गोविंद सिंग इंग्लिश हायस्कूल मुलं शिक्षण पासून वंचित महारल कल्याण येथील नववीच्या मुलांना परीक्षांत फी नाही भरली म्हणून पंचवीस ते तीस मुली मुलांना शाळेतून घरी पाठवले आधी फी भरा

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर /रशीद शेख**

महारल गावं येथे एक गुरु गोविंदसिंग हि शाळा आहे खासगी संस्था आहे आज या शाळेत नववीच्या मुलांना मुलींना परीक्षांत फी नाही भरल्या मुळे बसु नाही दिलें चालु वर्षीची फक्त फी बाकी आहे ह्या मुला मुलींचे भविष्य धोक्यात येण्याची शक्यता आहे अश्या खाजगी शाळा संस्था शासनाने बंद केल्या पाहिजेत यांच्या नोंदणी रद्द करण्यात आल्या पाहिजे असे पालकांचे म्हणणे आहे आम्ही या शाळेत आमचें मुलें आज पहिली पासुन शिकत आहे मग नववीच्या वर्गात प्रवेश घेतला आणि परिक्षात बसला की फी मागतात आधी का आम्हाला कळविले नाही अजुन वर्ष संपले पण नाही या शाळेत थोडीशी सुट नाही गरीब आणि श्रीमंत एकच आकडा आहे थोडसी सवलत तरी द्या असे पालकांचे म्हणणे आहे आज या मुलांचे भविष्य हि शाळाच खराब करतेय आपण जर मुलांना म्हणालो की बाळा अभ्यास कर ते मुलं आम्हाला म्हणतात की अभ्यास करून काहिच फायदा नाही का तर आम्हाला परीक्षांत बसून नाही देत तर अभ्यास करुन फायदाच नाही त्या पेक्षा गुरे ढोरे सांभाळा ते बरे पडेल असे मुलं वडील आणि आईला उत्तर देतात ह्या शाळेकडे शिक्षण मंत्री साहेब उघडा डोळे बघा नीट असे तुम्हाला कळकळीची विनंती आहे सरकार मायबाप आपण जरा या गोष्टी कडे जातीने लक्ष घालून या गोरं गरिबांच्या मुलां मुलींकडे लक्षे घालावेत हिचं आमची पालकांची विनंती आहे आमचें समाज सेवक गोरखनाथ मेखले व सर्वच गावकरी ग्रामस्थ महिला मंडळ बचत गट यांनी या शाळेच्या आवारात घेरावा घातला आहे आणि वातावरण निर्माण झाले आहे सर्वांच्या तोंडावाटे एकच शब्द बाहेर पडत होते की हि शाळा बंद केली पाहिजे या शाळेच्या मनमानी कारभार सध्या चालू आहे हे कुठे तरी थांबले पाहिजे नाही तर आपल्या मुलांचे भविष्य धोक्यात येऊ शकते अशी पालकांच्या व्यथा ताबडतोब हि शाळा शासनाच्या ताब्यात गेली पाहिजे असे असे महिला गर्जत होत्या




# धोक्याचा इशारा दुर्लक्षित; अखेर रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा-पालव साकव कोसळलाच!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीत गंभीर दुर्घटना , प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे ग्रामस्थ संतप्त

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा-पालव गावांना जोडणारा आणि नागाव, चौल, तसेच पर्यटकांसाठी महत्त्वाचा असलेला साकव आज अखेर कोसळला. या दुर्घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून ग्रामस्थांमध्ये संतापाचा भडका उडाला आहे.

हा साकव केवळ वाहतुकीचा मार्ग नव्हता, तर तो शालेय विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण, शेतकरी आणि पर्यटकांसाठी जीवनवाहिनी होती. ग्रामस्थांनी सातत्याने प्रशासनाचे लक्ष वेधूनही पुन्हा एकदा 'फाईलातून फाईल' आणि 'दप्तरी आश्वासनां'चा बळी एक महत्त्वाचा सार्वजनिक रस्ता ठरला आहे. इशारा दिला, दुर्लक्ष झालं आणि कोसळला साकव!

गेल्या अनेक महिन्यांपासून या साकवाची अवस्था अत्यंत धोकादायक बनली होती. ग्रामस्थांनी तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायत यांच्याकडे निवेदनं, अर्ज, विनंत्या, तक्रारी केल्या. मात्र, कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. या अपप्रशासकीय उदासीनतेमुळे अखेर साकव कोसळला आणि शासनाची झोपच उडाली. जिवीतहानी टळली, पण किती वेळ अशा नशिबाच्या भरवश्यावर ?सुदैवाने या घटनेत जीवित किंवा वित्तहानी झाली नाही. मात्र ही 'देवाची कृपा' की 'प्रशासनाची जबाबदारी' ? आज शाळेची वेळ असती, कुठलाही रुग्ण वाहतूक करत असता, पर्यटकांची गाडी गेली असती – तर काय घडलं असतं याचा विचारच थरकाप उडवणारा आहे. मुख्यमंत्र्यांनी लक्ष घाला, कारवाई करा !स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे थेट मागणी केली आहे की, या साकवप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर तत्काळ चौकशी व कारवाई करण्यात यावी, आणि नवीन साकवाचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात यावे.पावसाळा आणि धोकादायक साकवांचे पुनरावलोकन आवश्यक !या घटनेनंतर आता एक प्रश्न सर्वत्र विचारला जात आहे 'प्रशासन फक्त दुर्घटना झाल्यावरच जागं होणार का?' भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व धोकादायक साकवांची तात्काळ तपासणी करून योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

